गुरुवार, ८ डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -११४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 08 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-114 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

## दिगंबरा दिगंबरा...



दत्त जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विविध मंदिरात श्रींचा जयघोष करून सर्वांनी दत्त जन्माचा आनंद साजरा केला. यावेळी लाखो भाविकांनी श्रींच्या मूर्तीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला.

# दिल्ली 'आप'ची

## भाजपची दीड दशकाची सत्ता संपुष्टात

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली : महापालिका निवडणुकीच्या आम आदमी पक्षाला बहुमत मिळाले आहे. यासोबतच दिल्ली महापालिकेवरील भाजपची दीड दशकाची सत्ता संपुष्टात आली आहे. दिल्ली महापालिका निवडणुकीत आम आदमी पक्षाने कमाल केली आहे. दिल्ली महापालिका निवडणुकीत आम आदमी पक्षाला बहुमत मिळाले आहे. यासोबतच दिल्ली महापालिकेवरील भाजपची दीड दशकाची सत्ता संपुष्टात आली आहे. या निवडणुकीत मुख्य लढत आप, भाजप आणि काँग्रेसमध्येच होती. भाजपने कडवी लढत दिली आहे.**

दिल्ली महापालिकेच्या 250 जागांसाठी 4 डिसेंबर रोजी मतदान झाले होते. तर आज (7 डिसेंबर) मतमोजणी पार पडली. या निवडणुकीत 250 जागांसाठी एकूण 1349 उमेदवार मैदानात होते. दिल्ली महापालिकेवर गेल्या 15 वर्षांपासून भाजपची सत्ता होती. मात्र यंदा आम आदमी पक्षाला दिल्ली महापालिकेची सत्ता काबीज करण्यात यश आले आहे. दरम्यान, दिल्ली महापालिकेच्या 250 पैकी 233 जागांचे निकाल हाती आले आहेत. यात आम आदमी पक्षाला 126 जागांवर विजय मिळाला आहे. तर भाजप 97 जागांवर विजयी झाली आहे. काँग्रेसने 7 जागांवर विजय संपादन केला आहे. तर 3 अपक्ष उमेदवाराचा विजय झाला आहे.

**भाजपचे पसमांदा कार्ड फेल**

पसमांदा कार्ड खेळत भाजपने एमसीडी निवडणुकीत चार पसमांदा मुस्लिमांना उमेदवारी दिली होती. यामध्ये तीन महिला होत्या. पसमांदा मुस्लीम हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टीने सर्वात मागासलेले समजले जातात. यामध्ये अन्सारी, कुरेशी, मन्सुरी, सिद्दीकी अशा 41 जातींचा समावेश आहे. दिल्ली महापालिका निवडणुकीत भाजपचा एकही मुस्लीम उमेदवार विजयी होताना दिसत नाहीत. कलांमध्ये बहुमत मिळाल्यानंतर आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करण्यास सुरुवात केली. दिल्लीमध्ये आपच्या कार्यालयाबाहेर सेलिब्रेशन सुरु आहे. तर मुंबईतही आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. दिल्ली महापालिकेच्या निवडणुकीसाठी 13638 मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. या निवडणुकीत सुमारे 50 टक्के मतदान झाले होते. यामध्ये सर्वाधिक मतदान 65.72 टक्के प्रभाग क्रमांक 5 बख्तावरपूर इथे तर सर्वात कमी 33.74 टक्के मतदान प्रभाग क्रमांक 145 अँड्र्यूज गंज इथे झाले होते. 2017 च्या दिल्ली महापालिका निवडणुकी भाजपने 270 पैकी 181 प्रभाग जिंकले होते. या निवडणुकीत आपने 48 तर काँग्रेसला 27 जागांवर विजय मिळवला होता. या निवडणुकी 53 टक्के मतदान झाले होते.

**आम्हाला पंतप्रधानांचे आशीर्वाद हवेत : केजरीवाल**

दिल्ली महानगरपालिका निवडणुकीमध्ये मोठे यश मिळवल्यानंतर आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पहिली प्रतिक्रिया नोंदवताना पंतप्रधान नरेंद्र मोदींचा उल्लेख केला आहे. आम्हाला पंतप्रधान मोदींचा आशीर्वाद आणि केंद्र सरकारचे सहकार्य हवे आहे, असे केजरीवाल यांनी १५ वर्षानंतर भारतीय जनता पार्टीची महानगरपालिकेतील सत्ता संपुष्टात आणल्यानंतर म्हटले आहे. माझेही तुमच्यावर प्रेम आहे, अशी आपल्या भाषणाला सुरुवात करत केजरीवाल यांनी मतदारांचे आभार मानले. दिल्ली महानगरपालिका निवडणुकीमध्ये मोठ्या फरकाने विजयी झाल्यानंतर 'आप'च्या कार्यकर्त्यांना केजरीवाल यांनी संबोधित केले. 'आप'च्या विजयामुळे दिल्लीमध्ये आता डबल इंजिनचे सरकार असणार आहे. २०१५ पासून या ठिकाणी राज्यात 'आप'ची सत्ता असून आता महानगरपालिकेवरही आपने झेंडा फडकवला आहे. भाजपाने अनेक मार्गावर आमची अडवणूक करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप 'आप'ने केला आहे. केंद्रातील सरकार, नायाब राज्यपाल आणि महानगरपालिकेच्या माध्यमातून भाजपाने आमची अडवणूक केली असे 'आप'ने म्हटले आहे. आम्हाला केंद्र सरकारची मदत हवी आहे. आम्हाला पंतप्रधान आणि केंद्राच्या आशीर्वादाची गरज आहे, असे केजरीवाल यांनी म्हटले आहे. या निवडणुकीमधून लोकांना सकारात्मक राजकारणाची आवश्यकता असून नाकारात्मक राजकारण त्यांनी दूर केले आहे, असेही केजरीवाल म्हणाले. "मी सर्व पक्ष आणि उमेदवारांना आवाहन करतो की आझपर्यंत आपण राजकीय वाद घातले. मात्र आता आपल्याला एकत्र काम करायचे आहे. आम्हाला भाजपा आणि काँग्रेसचे सहकार्य हवे आहे. आपण एकत्र येऊन दिल्लीतील समस्या सोडवू, असेही केजरीवाल म्हणाले.



# रेपो दरात वाढ; कर्ज महागणार!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय रिझर्व्ह बँकेने आज तीन दिवसीय चलनविषयक धोरण समितीचे (एमपीसी) निर्णय जाहीर केले. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी समितीचे चलनविषयक धोरण जाहीर केले. यावेळी आरबीआय गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज रेपो दरात ०.३५ टक्क्यांनी वाढ केल्याची घोषणा केली. यानंतर रेपो दर ६.२५ टक्के झाला आहे.शक्तिकांत दास यांनी सांगितले की, एमपीसीच्या ६ पैकी ५ सदस्यांनी रेपो दरात बहुमताने वाढ करण्यास समर्थन दिले आणि त्यानंतर आरबीआयने रेपो दर ०.३५ टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला. आरबीआयने सलग पाचव्यांदा व्याजदरात वाढ केली आहे.गव्हर्नर शक्तीकांत दास म्हणाले की, आम्ही आणखी एका आव्हानात्मक वर्षाच्या शेवटी आलो आहोत आणि केवळ देशातच नाही तर जगातील अनेक देशांनी महागाईचा दर वाढविलेला आहे.



# बोम्मईंच्या प्रतिमेला जोडे

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** कर्नाटक सीमेत काही संघटनांनी घातलेल्या धुमाकुळाचा जिल्ह्यात निषेध करण्यात आला. बुलढाणानजीक कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या प्रतिमेला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी बुधवारी जोडे मारले. बेळगावजवळील हिरेबागवाडी टोल नाक्यावर महाराष्ट्राच्या काही वाहनांवर हल्ला करण्यात आला.

# अखेर नरभक्षी वाघ पिंजऱ्यात कैद; रेस्क्यू पथकाला यश


## वन विभागाचे कौतुक : चाळीस कर्मचारी, ट्रॅप कॅमेरे, पिंजरा, डॉट मारून बेशुद्ध करण्याची रणनीती



आधुनिक केसरी न्यूज

राहुल वासनिक

यवतमाळ : वणी तालुक्यात नरभक्षी वाघाने चांगलाच धुमाकुळ घातला होता. दोघांचा बळी आणि एक तरुण जखमी झाल्यानंतर वन विभाग एक्शन मोडमध्ये आलेत. चाळीस कर्मचारी, ट्रॅप कॅमेरे, पिंजरा आणि डॉट मारून बेशुद्ध करण्याची रणनीती आखण्यात आली. अखेर आज बुधवार दि. 7 डिसेंबरला सकाळी नरभक्षी वाघाला पिंजऱ्यात कैद करण्यात रेस्क्यू पथकाला यश आले आहे. वणी तालुक्यात सातत्याने आढळणारा वाघ कालांतराने नरभक्षी झाला होता. त्याने काही दिवसांपुर्वी रांगणा भुरकी येथील अभय देवूळकर या युवकाला ठार केल्यानंतर दि. 27 नोव्हेंबरला कोलार पिंपरी येथील रामदास पिदूरकर (58) यांचेवर हल्ला चढवला त्यात त्यांना जीव गमवावा लागला. तर ब्राम्हणी येथे टॉवरचे काम करणाऱ्या उमेश पासवान या मजुरांवर वाघाने हल्ला चढवला होता त्यात तो गंभीर जखमी झाला होता. वणी तालुक्यात नरभक्षी वाघाने चांगलाच हैदोस माजविल्यानंतर वन विभागाने वाघाला पकडण्यासाठी विव्हरचना आखली. पुसद येथील पथक, पांढरकवडा येथील मोबाईल स्कॉड, रेस्क्यू पथक व वणी येथील अधिकारी व कर्मचारी सज्ज झालेत. मागील आठ दिवसापासून त्या नरभक्षी वाघाच्या मागावर होते. या करिता ट्रॅप कॅमेरे, पिंजरे कोलार पिंपरी परिसरातील जंगलात लावण्यात आले होते.बुधवारी सकाळी रेस्क्यू पथकाच्या निदर्शनास तो वाघ आला. त्याला डॉट मारून बेशुद्ध करून पिंजऱ्यात जेरबंद करण्यात आले. नरभक्षी वाघाला पकडण्यात आल्यामुळे नागरिक, शेतकरी, शेतमजूर व वेकोली कर्मचारी यांनी सुटकेचा श्वास घेतला. त्या वाघाला नागपूर येथे हलविण्यात येणार आहे, या कारवाई ने वन विभागाचे कौतुक होत आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## तुमची देहबोली सांगते तुमच्याबद्दल...



लहानपणापासून आपली बोलीभाषा आपल्या कानावर पडत असते. आपण ती बोलायला शिकतो. अगदी तशीच आपली देहबोली सुद्धा आपल्यासोबत असते. आणि प्रसंगी ती शब्दांपेक्षाही अधिक प्रभावी ठरते. इंग्रजीतील Actions speak louder than words हे वाक्य सुद्धा आपल्याला देहबोलीचे महत्व स्पष्ट करते. पण आपल्या देहबोलीकडे आपण म्हणावे तसे जाणीवपूर्वक लक्ष देत नाही. किंबहुना तिला आपण गृहीत धरतो.

आपली देहबोली समोरच्याला खूप काही सांगून जाते. उदाहरण म्हणून काही लोकप्रिय गाणी बघा. ' चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले.' या गीतातून तुझे चालणे किती सुंदर आहे हे प्रभावीपणे सांगितले आहे. किंवा हे गीत बघा. ' लाजून हासणे अन हासून ते पाहणे, मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे.' या गीतातली प्रेयसीची देहबोली प्रियकराला बरेच काही सांगून जाते. अशा रीतीने आपली देहबोली प्रत्येक प्रसंगातून व्यक्त होत असते. चालताना आपण कसे चालतो ? समोरच्याला आपली चाल कशी वाटते ? त्यावरून लोक आपल्याबद्दल काही मत बनवीत असतात. पुरुषांच्या बाबतीत रुबाबदार चाल आणि स्त्रियांच्या बाबतीत डौलदार चाल आपले मन आकर्षून घेते. चित्रपटातील नायकांचे चालणे,बोलणे, उभे राहणे इ गोष्टी म्हणजे देहबोली कशी असावी याचा एक प्रकारचा वस्तुपाठच असतो. राजेश खन्ना, विनोद खन्ना इ नटांचे रुपेरी पडद्यावरील चालणे प्रेक्षकांचे मन आकर्षून घेत असे. अमिताभचे उभे राहणे आणि त्याला त्याच्या प्रभावी बोलण्याची जोड हे सगळे मिळून एक अजब रसायन तयार होते. म्हणूनच त्याचे ' हम जहां खडे होते है, लाईन वहीसे शुरू होती है ' यासारखे संवाद खूपच प्रभावी ठरतात. आपल्या जर आपल्या अनुकूल देहबोलीची जोड असेल तर आपली प्रगती कोणीही थांबवू शकणार नाही. आपण प्रभावी देहबोलीची वर काही उदाहरणे पाहिली. ती चित्रपटातील कलाकारांची होती. आपल्याला त्यांचे अनुकरण करण्याची आवश्यकता नाही. पण दुसऱ्याची देहबोली पाहण्याआधी आपण आपल्या देहबोलीचे नीट निरीक्षण केले पाहिजे. **क्रमशः**



## आनंदी पहाट


### व्यक्त होणे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे लक्षण

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या संवादातून, लेखनातून, देहबोलीद्वारे आणि विविध क्रिया-प्रतिक्रियांतून आपण व्यक्त होत असतो. व्यक्त न होणाऱ्या व्यक्तीची घुसमट वाढत जाते. मोकळेपणानं मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचं देखील जाणवतं. ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचं निराकरण होत जातं. काहीवेळा उद्भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते. मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीनं मोकळेपणानं आपल्या मनांतील शंका व्यक्त करणं उपयुक्त ठरतं. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात. प्रत्येक वेळेला प्रत्येक प्रश्नाची उत्तरं सारखी नसतात, प्रत्येकाचे प्रश्न निराळे असतात, उत्तरेही प्रत्येकासाठी भिन्न असतात. जसं व्यक्ती तितक्या प्रकृती तसंच, जसे प्रश्न तशी त्यांच्यासाठी उत्तरे, हे लक्षात घेणं जरुरीचं असतं. एखाद्या समस्येचं उत्तर सर्वांनाच लागू होतं असं नाही, हेही समजून घेणं आवश्यक असतं. व्यक्त होणारीच व्यक्ती असते; अशाच व्यक्तीचं व्यक्तिमत्व चार चौघांपेक्षा निराळं असतं. खरं तर, व्यक्त न होणारा जीव ह्या भूतलावर सापडणे विरळाच. जन्माला आलेला प्रत्येक जीव काही ना काही प्रकारे व्यक्त होण्याचा प्रयत्न करतच असतो. ते व्यक्त होणं आवाजाच्या माध्यमातून, लिखित स्वरूपांत, देहबोलीच्या वापरांतून होत असतं. आपल्या अंतर्मनांत येणारे विचार, विषय, घटना, अनुभव आपण अगदी जवळच्या, आपल्या हक्काच्या व्यक्तीजवळ बोलून दाखवत असतो. म्हणजेच एकप्रकारे आपण व्यक्तच होत असतो. तसं करण्यामुळे आपल्या मनांत साठून राहिलेल्या विचार बाहेर पडतात, त्यांना मोकळी वाट करून दिली जाते. निसर्ग नियमानुसार ते गरजेचं असतं.



आधुनिक केसरी

## तोचि प्रिय भक्त | ईश्वराचा ||

होता कार्य सिध्दी | सुख ओसंडते ||
जळोनिया जाते | दुःख सारे ||१||
सत्कार्याचे फळ | पुण्याचा संचय ||
पापाचा तो क्षय | होत असे ||२||
जरी गरीबीचा | फाटका संसार ||
नेकीचा व्यवहार | सुख देई ||३||
नको भुलु राजा | ऐहिक सुखाला ||
अंती सोबतीला | कोणी नसे||४||
परमार्थ करूनी | व्हावे ताप मुक्त ||
तोचि प्रिय भक्त | ईश्वराला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरूपण”

आधुनिक केसरी

### भक्ती


जगी तू वरिष्ठा तथा वत्सला तू
तुझे प्रेम माये असे सर्व माझे ।
सदा सोबती तू कृपाकारिणी तू
तुझे प्रेम माये असे सर्व माझे ।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## काव्य-चरितावली

### पुष्प -४ थे



आधुनिक केसरी

शके-१७६६,ई.स.१८४५ वर्षातल्या
माघ-शुद्ध द्वादशी बुधवार सुर्योदयी
गोंदवल्यास श्री महाराज जन्मले
पंतास नातू झाला, आनंद वृत्त पसरले ।। १ ।।

फुले पांडुरंगा वाहून, साखर सर्वां वाटली
बाळा पाहण्या खुप मंडळी प्रेमाने आली
गोजिरी बाळमूर्ती पाहून सारे आनंदली
माता-पिता बाळाचे धन्य धन्य जाहली ।। २ ।।

बारसे श्रीमहाराजांचे आनंदोत्सवात ,
मोठ्या थाटामाटात संपन्न हो जाहले,
नामकरण बाळाचे "गणपती"असे जाहले
तान्हेबाळ साऱ्यासाठीच कौतूक जाहले ।। ३ ।।

श्रीमहाराजांचा जन्म ऐश्वर्य कळसजणू
आजोबा लिंगोपतांच्या आयुष्यातला
नातवाचा असीम लळा सहज लागला
राजस,सुंदर बाळ घरात रांगु लागला ।। ४ ।।

सद्गुरू चरणी अक्षरसेवा अशीच होवो
कवी अरुणदास म्हणे ईच्छा पूर्ण होवो ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342



## मनाचे श्लोक

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

आधुनिक केसरी

***देह्यादीक प्रपंच हा चिंतियेला। परी अंतरी लोभ निश्चित ठेला। हरीचिंतने मुक्तिकांता वरावी। सदा संगती सज्जनाची धरावी।।१६५।।***

**श्लोकार्थ :** मनुष्य आपल्या देहाचे आणि मुलाबाळांचे म्हणजे आपल्या संसाराचे चिंतन करतो. पण त्यामुळे त्यांच्या अंतःकरणात प्रपंचाची आसक्ती घट्ट होत जाते. ते सोडून माणसाने भगवंताचे चिंतन केले तर त्यास मोक्ष प्राप्त होईल. पण हे साध्य होण्यासाठी आत्मबुद्धि स्थिरावलेल्या मनुष्याची नित्य संगत असावी.

**विवेचन :** मन हे सतत कसला न कसला विचार करीत असतेच. आपण सर्व संसारी माणसे असल्यामुळे आपल्या मनात साहजिकच संसाराचे म्हणजे मुलंबाळं, घर, नोकरी, नातेवाईक, मित्रमंडळी तसेच वैयक्तिक हेवेदावे आदी गोष्टींचे विचार येतजात असतात. पण त्याचा परिणाम असा होतो की आपल्याला संसार (प्रपंच) खरा वाटू लागतो. मनुष्याच्या मनात सतत प्रपंचाचा विचार चालू राहतो. जे पोटात असते तेच ओठात येते असे म्हणतात. मनुष्याच्या ध्यानी, मनी, चिंतनी सतत प्रपंच असल्याने, त्याला जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी प्रपंच दिसत असल्याने जरी भगवंत प्रसन्न झाला तरी मनुष्य मुक्ती न मागता प्रपंचातील वस्तू मागेल. याला कारण एकच, जे मनात ते ध्यानात आणि तेच व्यवहारात. सर्व संत उपजत ज्ञान घेऊन जन्माला आले होते असे म्हणता येणार नाही. संतांनी जितके प्रापंचिक दुःख सोसले त्याच्यापेक्षा आपले दुःख निश्चितच कमी आहे. आजपर्यंत कोणी आपल्यावर बहिष्कार टाकलेला नाही. आपल्यापैकी कोणाची अन्नअन्नदशा झालेली नाही. आपण कोणीच मोगलाई अनुभवलेली नाही. इतकी सारी दुःखे उराशी घेऊन सर्व संतांनी भगवतांच्या प्राप्तीची इच्छा ठेवली, नव्हे ते मिळण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला आणि ईश्वर कृपेने ते त्यात यशस्वीही झाले. माणूस प्रपंच करतो. फक्त स्वतःच्या देहाला जगवण्यासाठी केलेले प्रयास म्हणजे प्रपंच नाही. मी स्वतः तर आहेच, शिवाय मी ज्यांना माझे म्हणतो ते सारे, म्हणजे माझे आईवडील, पत्नी, अपत्ये, आप्त, मित्र अशा अनेकांचा समावेश असलेले आपले जीवन जगणे म्हणजे प्रपंच करणे. या साऱ्यांच्याबद्दल मनात लोभ असल्यामुळे त्यांच्याही योगक्षेमाची चिंता करत मनुष्य प्रपंच करतो. मी म्हणजे माझा देह इथपासून वाढलेल्या या गोतावळ्याचा मोह, त्याच्याबद्दलचा लोभ मनात बाळगून त्याच्या ऐहिक सुखासाठीच्या म्हणजेच देहादिक प्रपंचाच्या चिंता वाहताना त्यात देवाला स्थान कोठे असते? 'देखल्या देवा दंडवत' यातच? देवाची पूजा करत असतानासुध्दा प्रापंचिक विचारांच्या भाऊगर्दीत ती पूजाही यांत्रिकतेने केल्यासारखीच केली जाते. मनुष्य जशी देवाची पूजा करतो, तशी पूजा जर कोणी आपली केली तर आपण त्याला कोणता आशीर्वाद देऊ, याचा विचार मनुष्याने करावा आणि आपल्या पूजेत आवश्यक तो बदल करावा. मनुष्य सातत्याने प्रपंचाचा विचार करीत असल्याने मृत्यू समीप आला तरी त्याला प्रपंचच आठवतो. "अंत मति सो गति" या न्यायाने मनुष्य पुन्हा जीवन मरणाचा फेऱ्या मारीत रहातो. याला मुख्य कारण ठरते ते म्हणजे मनुष्याच्या प्रपंचाबद्दलचा लोभ. मनुष्य पत्नीवर जसे निरातिशय प्रेम करतो तसेच प्रेम प्रपंचाच्या चिंतांपासून मिळवायच्या मुक्तीवर करायला पाहिजे, असे समर्थ आपल्याला या श्लोकात सांगत आहेत. मागील काही श्लोकात याचा उल्लेख आलेला आहे, परंतु एकदा सांगून काम झाले असते इतक्या संतांना एवढी लिखापढी करावी लागली नसती.

मुक्तीचे चार प्रकार समर्थांनी दासबोधात सांगितले आहेत. चारी मुक्ती ज्याला मिळाल्या त्याच्या अत्यंतिक दुःखाची निवृत्ती होऊन परमोच्च सुखाची प्राप्त होती. मात्र या चारी मुक्ती मिळणं खूपच कठीण, दुरापास्त असल्याचा धाक पूर्वसुरींनी दाखवलेला आहे. प्रत्येक मुक्ती करण्यासाठी वेगवेगळ्या साधनेचा मार्ग सांगितलेला आहे. चार मुक्तींपैकी पहिली मुक्ती आहे सलोकता. ज्या लोकात देवाचं वास्तव्य असतं, त्या लोकांत प्रवेश मिळतो. त्याला सलोकता मुक्ती असं म्हणतात. ही मुक्ती उपासनेने प्राप्त होते. त्यानंतरची मुक्ती आहे समीपता. भगवंतांच्या समीप म्हणजे जवळ पोहोचण्याइतकी पात्रता निर्माण होणं म्हणजे समीपता मुक्ती प्राप्ती होणं असं म्हणतात. ही मुक्ती तपाने मिळते. तिसरी मुक्ती आहे स्वरूपता. म्हणजे भक्ताला भगवंताचंच स्वरूप प्राप्त होतं. ही मुक्ती भगवंतांच्या चिंतनाने प्राप्त होते. अखेरची आणि सर्वोच्च मुक्ती आहे ती सायुज्यता. म्हणजे स्वतः भगवंत होणं. अहं ब्रह्मास्मी या बोधावर आरूढ होणं. परमेश्वराचे चिंतन मनापासून करत सायुज्य मुक्ती हीच आपली परिणिता, कांता बनून मिळावी असे मागणे त्याच्याकडे करावे. सर्व सतांना अशा मुक्तीची ओढ लागलेली असते. समर्थ इथे जसे म्हणतात की 'हरीचिंतने मुक्तिकांता वरावी।' त्याप्रमाणेच तुकाराममहाराज म्हणतात 'तुका म्हणे मुक्ति पर्णिली नोवरी| आता दिवसचारी खेळीमेळी||' मुक्तीची आस धरणाऱ्या अशा संतांकडून उपदेश मिळाल्यास आपल्या जीवनाचे सार्थक होते. म्हणूनच समर्थ सांगतात त्याप्रमाणे संतांचा सहवास मिळवणे आवश्यक असते. मनुष्य स्वाभाविकपणे ज्याचे नित्य चिंतन करतो तीच गोष्ट आपल्याला आपल्या मरणाच्या वेळी आठवते. त्यामुळे त्या इच्छा आकांक्षा पुऱ्या करण्यासाठी त्याला पुन्हा गर्भवास सोसावा लागतो. इतके चिंतन करून किंवा ध्यास घेऊन प्रपंचात कोणी सुखी झाला आहे असे दिसत नाही. प्रपंच करीत असताना आपण जर रोज थोडे थोडे का होईना नाम घेत गेलो तर आपल्याला हळूहळू भगवंतांची गोडी लागेल. मन भगवंताच्या भक्तीने भरून जाईल. मनाला विशालता प्राप्त होईल. सासरी गेलेल्या मुलीच्या मनातून माहेर कधीही जात नाही. तिच्या मनाच्या कोपऱ्यात माहेरासाठी एक कप्पा माहेरच्या रेशमी आठवणींसाठी कायम शिल्लक असतो आणि सुरक्षित असतो. आपल्या सर्वांचे माहेर एकच आहे, ते म्हणजे भगवंत (परमात्मा). संतसंगती आणि आवश्यक ती साधना केल्यास मुक्ति आपल्या दाराशी येईल. संत तुकाराम महाराज देवाची भक्ती कशासाठी करायची ते आपल्याला पुढील अभंगात सांगत आहेत. *"याजसाठी केला होता अट्टाहास । शेवटाचा दिस गोड व्हावा ॥१॥.आतां निश्चितीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥२॥ कवतुक वाटे जालिया वेचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥३॥ तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥४॥"*

# रेशन दुकानाची चौकशी करून परवाना रद्द करा

## मक्रणपूर जिल्हा पुरवठा अधिकारी यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**

**कन्नड :** शहरालगत असलेले मक्रणपुर येथील रेशन क्रमांक 53 दुकान धारकाकडुन मयत, निर्वासित, विस्तापित, तसेच अंत्योदय कार्ड धारकाची धान्य व साखर काळ्या बाजारात विकतो म्हणून सदर बाबीची चौकशी करून योग्य ती कारवाही करावी, असे निवेदन सादिक कादर सैय्यद यांनी तालुका पुरवठा अधिकारी, तहसीलदार कन्नड तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांना दिले असून मक्रणपूर गाव पाच हजार लोकसंख्येचे असून गावात दोन किंवा तीन रेशन दुकान असायला हवे मात्र सदरील रेशन धारक विनायक सोनवणे हा गेल्या तीस वर्षापासुन ग्रामपंचायत सत्तेत असल्याने एक ही नविन रेशन दुकानाचा ठराव घेऊ दिला नाही त्या मुळे गावात एकच रेशन दुकान असल्याने दुकानावर चांगलीच झुंबड पडत आहे. रेशन दुकानदार रेशन कोटा आल्यावर फक्त दोन दिवसात वाटप केल्याने शिधा धारकास तासन तास ताटकळत बसावे लागते यामुळे भांडणाचे प्रमाण ही वाढत आहे व जाती जातीत तेढ निर्मान होत आहे. नियमाप्रमाणे सकाळी व सायंकाळी रेशन दुकान सुरू असायला हवे परंतु असे होत दक्षता समितीचे फलक नाही, स्टॉक माल फलक नाही, वाटप माल फलक नाही, शिल्लक मालाचे फलक नाही, कार्ड धारकाची संख्या दर्शक



फलक नाही सारे काही अलबेल आहे.
स्वःहाच्या मुलाचे नाव आंत्योदय योजनेत टाकुन रेशन लाटुन शासनाची फसवणुक करत आहेत. मयत, निर्वासित, विस्तापित नावावरचे किती क्विंटल धान्य हे काळ्या बाजारात विकल्या जाते ही तर गावातील नागरीकांची व शासनाची फसवणुक सुरू आहे याकडेही गांभीर्याने लक्ष द्यावे लागेल.
म्हणुनच सादिक कादर सैय्यद इतर दहा नागरीकांनी तालुका पुरवठा अधिकारी तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कडे तक्रार केली असता जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी चौकशी करून योग्य ती कारवाहीचे आदेश दिले आहेत.
काही रेशन धारकास रेशन कमी देणे काहीनां देतच नाही रेशन दुकानदारांच्या अरेरावी ॲट्रॉसिटीच्या धमक्या देणे रेशन दुकानदाराच्या जाचाला कंटाळुन सुमारे शंभर ते दोनशे कार्ड धारक दुसऱ्या रेशन दुकादाराकडुन रेशन घेत आहे असे ही या निवेदनात म्हटले आहे. या सर्व बाबीकडे पुरवठा विभागाने गांभीर्याने घेऊन योग्य ती कारवाई करावी असे गावातील नागरीकांचे सुद्धा म्हणने आहे.



मला जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे मक्रणपुर रेशन दुकानाचे कारवाईचे पत्र प्राप्त झाले असुन मी पुरवठा निरीक्षक यांना रेशन दुकानावर जाऊन प्रत्येक्ष पाहणी करून योग्य ती कारवाई करण्याचे पत्र दिले आहे . **हारूण शेख, पुरवठा अधिकारी**

# संजय राऊत चिथावणी देणे बंद करा, अन्यथा संयम सुटेल

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** खा. संजय राऊत यांनी तुरुंगात शिकलेली षंढ, नामर्द अशी भाषा वापरून चिथावणी देणे आणि आव्हान देणे बंद केले पाहिजे, अन्यथा संयम सुटेल आणि भारतीय जनता पार्टी रस्त्यावर उतरेल, असा खणखणीत इशारा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलताना दिला.
ते म्हणाले की, संजय राऊत यांनी आव्हान देऊ नये, राज्याचे राजकीय वातावरण खराब करू नये आणि सामाजिक वातावरण बिघडवू नये, अन्यथा लोकांचा संयम सुटेल. यातून उद्या उद्रेक झाला तर थांबविता येणार नाही. कोणत्याही नेत्याचा व्यक्तिगत अपमान होईल, असे संजय राऊत यांनी बोलू नये. मर्दानगी काढणे, नालायक म्हणणे हे महाराष्ट्र सहन करणार नाही. राऊत यांनी चिथावणी देणे बंद करावे. नाही तर त्यांच्या बोलण्याचा उलटा परिणाम होईल. महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यावर न्यायालयातच तोडगा निघेल. न्यायालयाने लवकरात लवकर सुनावणी करून या प्रकरणी निर्णय द्यावा यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावेत, असे आपले आवाहन आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले.
ते म्हणाले की, या प्रश्नी सर्वोच्च न्यायालयातच तोडगा निघेल हे माहिती असूनही राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपण स्वतः सीमाभागात जाणार असल्याचे जाहीर करणे शोभत नाही. त्यांना सीमाभागात जायचे होते तर ते आधी का गेले नाहीत, असा प्रश्न निर्माण होतो. जी २० संबंधी बैठकीस निमंत्रण असूनही माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे गैरहजर राहिले. त्यांनी महाराष्ट्राच्या हितापेक्षा अधिक महत्त्व स्वतःच्या राजकारणाला दिले व महाराष्ट्राचा अपमान केला, असेही त्यांनी सांगितले.

# कर्नाटकाकडून मराठी बांधवांवर हल्ले होत असताना मुख्यमंत्री गप्प कसे ?

## बाळासाहेब थोरात : मुख्यमंत्र्यांनी तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलवावी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** सीमा भागात कर्नाटकातून मराठी बांधवांवर होत असलेले हल्ले अत्यंत गंभीर असून सीमा प्रश्नाने वेगळे वळण घेतले आहे. महाराष्ट्रातील ट्रक, बस व वाहनांची तोडफोड केली जात आहे. महाराष्ट्र कर्नाटकची अशा प्रकारची दंडेली सहन करणार नाही. सीमाप्रश्नावर महाराष्ट्रातील विरोधी पक्ष चिंता व्यक्त करुन मराठी बांधवांच्या पाठीशी उभे राहिले पण मुख्यमंत्री मात्र गप्पच आहेत. सीमा प्रश्नावर महाराष्ट्राची भूमिका काय आहे? पुढचे धोरण काय असेल ? यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.
टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, सीमा भागात मराठी लोकांवर होत असलेल्या हल्ल्यांमागे भारतीय जनता पक्ष असून यामागे त्यांचा काय स्वार्थ आहे याच्याशी आम्हाला काही देणेघेणे नाही. सीमाप्रश्नावर भाजपा चुकीचे राजकारण करत आहे. कर्नाटक व केंद्रात भाजपाचेच सरकार असल्याने केंद्रातून कर्नाटकला काही सुचना येत आहेत का? हे आम्हाला माहित नाही पण हा विषय गंभीर असल्याने आपल्या मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व पक्षांच्या नेत्यांना बोलावून चर्चा केली पाहिजे. वस्तुस्थिती काय आहे ती आम्हाला सांगितले पाहिजे आणि आपण काय धोरण घेणार आहोत हे सांगितले पाहिजे. मराठी बांधवांवर अन्याय होत असताना महाराष्ट्राने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.
कर्नाटकमधून जाणीवपूर्वक सीमाभागातील मराठी बांधवांची गळचेपी केली जात आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई व मंत्री सातत्याने महाराष्ट्र विरोधी विधाने करत आहेत. कर्नाटकच्या या दंडेलशाहीविरोधात जनतेत प्रचंड रोष आहे पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री स्पष्ट व खंबीर भूमिका घेत नाहीत. हे सर्व पाहता राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने सीमा प्रश्न गंभीरपणे घेतला आहे की नाही असा प्रश्न पडतो, असेही थोरात म्हणाले.



# ज्येष्ठ पत्रकार यशवंत हरणे यांनी राज्यपालांच्या हस्ते सत्कार नाकारला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या काही महिन्यांपासून राज्यपाल भगतसिंग कोशिअरी यांनी महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात वादग्रस्त वक्तव्य केले आहेत. या वक्तव्यामुळे राज्यात तीव्र पडसाद उमटत असतानाच आज राजभवनात होणाऱ्या समारंभातील सत्कार धुळ्याचे संघटनेचे जिल्हाध्यक्ष यशवंत हरणे यांनी नाकारला.

राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार संघटनेचा शपथग्रहण सोहळा सात डिसेंबर रोजी राजभवनात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांचा शपथ ग्रहण आणि सत्कार सोहळा राज्यपाल भगतसिंग कोशिअरी यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला. मात्र धुळे जिल्हाध्यक्ष यशवंत हरणे यांनी राज्यपाल यांच्या हस्ते होणारा सत्कार आणि शपथग्रहण सन्मान नाकारला आहे. समाज सुधारकांवर केलेल्या बेताल वक्तव्यांमुळे हा सन्मान स्वीकारत नसल्याची त्यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना कळवले आहे.
मुंबई येथील राजभवनात आज हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. तत्पूर्वी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना राज्यातील नामवंत मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक आणि नियुक्तीपत्रे दिली जाणार होती. यानंतर राजभवनात राज्यपाल यांच्या हस्ते या पत्रकार संघटनेच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सन्मान आणि शपथ ग्रहण केली जाणार होती. मात्र गेल्या काही महिन्यांपासून राज्यपाल भगतसिंग कोशिअरी यांनी महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात वादग्रस्त वक्तव्य केले आहेत. या वक्तव्यामुळे राज्यात तीव्र पडसाद उमटत असतानाच आज राजभवनात होणाऱ्या समारंभातील सत्कार धुळ्याचे संघटनेचे जिल्हाध्यक्ष यशवंत हरणे यांनी नाकारला आहे. या संदर्भात व्हाट्सअप वरून प्रतिक्रिया संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना त्यांनी कळवली असून यात महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात बेताल वक्तव्य करणारे राज्यपाल कोशीआरी यांच्या हस्ते सत्कार स्वीकारणे म्हणजे त्यांच्या वक्तव्याला अप्रत्यक्षपणे पाठिंबा देण्यासारखेच आहे. त्यामुळे मी आजच्या कार्यक्रमाला येऊ शकत नसल्याचे त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत नमूद केले आहे. दरम्यान राजभवनात होणारा सन्मान नाकारल्याची माहिती आज राज्यपाल यांच्या विरोधात धुळ्यात आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना मिळाली. यावेळी सर्वपक्षीय शिवप्रेमी युवकांनी पत्रकार यशवंत हरणे यांचा सत्कार केला आहे. यावेळी महेश मिस्त्री ,ज्येष्ठ पत्रकार निंबा मराठे, भानुदास बगदे, संजय बगदे, साहेबराव देसाई, गोविंद वाघ ,वामनराव मोहिते, आबा कदम यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# सुप्रियाताई आक्रमक

आधुनिक केसरी

मागील काही दिवसांपासून कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून सुरू असलेल्या वक्तव्याचे पडसाद आज संसदेत उमटले. लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेना ठाकरे गटाचे खा. विनायक राऊत यांनी आक्रमक पवित्रा घेत कर्नाटक सरकारच्या भूमिकेवर हल्लाबोल केला. कर्नाटक सरकारवर टीका केल्यानंतर लोकसभेत जोरदार खडाजंगी झाली. सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत म्हटले की, मागील 10 दिवसांपासून महाराष्ट्रात वेगळा मुद्दा चर्चेला येत आहे. कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडून बेताल वक्तव्य करण्यात येत आहे. महाराष्ट्रच्या नागरिकांना बेळगावच्या सीमेवर मारहाण करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या नागरिकांना झालेल्या मारहाण सहन करणार नाही. मागील 10 दिवसांपासून महाराष्ट्राविरोधात कट रचला जात आहे. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून महाराष्ट्र तोडण्याची भाषा केली जात आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न हा सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. कर्नाटक सरकारकडून मराठी भाषिकांवर अत्याचार, दडपशाही सुरू असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांनी म्हटले. एका राज्याच्या मंत्र्यांना प्रवेश करण्यास मनाई केली जाते. अशी बंदी घालणारे कर्नाटक हे पहिले राज्य आहे. कर्नाटक सरकारकडून सुरू असलेल्या अत्याचाराचा धिक्कार करत असल्याचे राऊत यांनी म्हटले. विनायक राऊत यांनी लोकसभेत हा मुद्दा मराठीत उपस्थित केला. महाराष्ट्राच्या खासदारांनी आक्रमक भूमिका घेतल्याने लोकसभेत गदारोळ झाला. महाराष्ट्राच्या खासदारांकडून कर्नाटक सरकारच्या भूमिकेवर हल्लाबोल केला जात असताना कर्नाटकच्या खासदारांनी त्यावर आक्षेप घेतला. महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या विरोधक अडचणीत आल्यावर हा मुद्दा उचलला जात असल्याचा दावा कर्नाटकच्या खासदारांनी केला. महाराष्ट्र-कर्नाटकत सीमा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने संसदेच्या कामकाजातून काढण्याचे आदेश लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दिले. ठाकरे गटाच्या राज्यसभा खा. प्रियांका चतुर्वेदी यांनी सीमावादा प्रकरणी राज्यसभेत स्थगन प्रस्तावाची नोटीस दिली आहे. तर, खासदार अरविंद सावंत आणि विनायक राऊत यांनी संसदेच्या प्रागंणातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ निदर्शने केली. बेळगावसह सीमाभाग केंद्रशासीत प्रदेश करा, अशी मागणी खा. राऊत यांनी केली आहे. दिल्लीच्या पाठिंब्याशिवाय बेळगावात मराठी माणूस आणि महाराष्ट्राच्या वाहनांवर हल्ला होऊ शकत नाही, असा आरोप राऊत यांनी केला. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांना अटक झाली आहे. महाराष्ट्राचा कणा मोडून मराठी स्वाभिमान कायमचा संपवण्याचा खेळ सुरू झाला आहे. बेळगावातील हल्ले हा त्याच कटाचा भाग असल्याची घणाघाती टीका राऊत यांनी केली.

# विषारी हवेशी झुंजणारी मुले



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**प्रदूषणाशी संबंधित जगातील पहिल्यांदाच केल्या गेलेल्या एका संशोधनात मानवी जीवनाला धोका निर्माण करणाऱ्या भयावह गोष्टी समोर आल्या आहेत. भारतासह जगातील एकशे सदतीस देशांत मातेच्या गर्भातच प्राण गमावलेल्या पंचेचाळीस हजार अर्भकांवर केलेल्या अभ्यासात असे समोर आले आहे की, यातील चाळीस टक्के बालकांच्या मृत्यूचे कारण हवेतील पीएम २.५ कण होते. संशोधनात समाविष्ट असलेल्या देशांमध्ये 2010 मध्ये 23.1 लाख, 2019 मध्ये 19.3 लाख आणि 2015 मध्ये 20.9 लाख बालकांचा जन्मापूर्वी मृत्यू झाला. जगात येण्यापूर्वीच प्राण गमावलेल्या बालकांपैकी साडेनऊ लाख बालकांच्या मृत्यूचे मुख्य कारण हवेतील पीएम २.५ हे प्रदूषित कण होते.'**

नेचर कम्युनिकेशन' जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या या संशोधनानुसार, गर्भवती महिला दूषित हवेत श्वास घेते तेव्हा हवेतील कण नाभीसंबधीच्या माध्यमातून नवजात बालकापर्यंत पोहोचतात. याचा परिणाम गर्भाच्या आरोग्यावर होतो. इतकेच नाही तर गुदमरणाऱ्या हवेच्या संपर्कात असलेल्या आईच्या शरीरात वाढणाऱ्या गर्भाला किंवा बाळाला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही. अशा गर्भात, बाळाच्या विकासावर परिणाम होतोच, तर काहीवेळा तो गुदमरतो. ही परिस्थिती खरोखरच चिंताजनक आहे. अलिकडच्या वर्षांत, जगातील प्रत्येक भागात वायू प्रदूषण वाढले आहे. हवेत विरघळणारे विष केवळ मानवांसाठीच नाही, तर पृथ्वीवरील प्रत्येक जीवासाठी धोकादायक बनले आहे. भारतातील महानगरांमध्ये, गुदमरणाऱ्या हवेमुळे नवजात आणि वाढणारी मुलेही अनेक आरोग्य समस्यांना बळी पडत आहेत. 2021 मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या संशोधनानुसार, जगभरात दरवर्षी 8.30 लाख नवजात बालकांच्या अकाली मृत्यूचे कारण दूषित हवा आहे. वास्तविक, वाढत्या वायू प्रदूषणाचा जीवनाशी निगडित प्रत्येक भागावर परिणाम होत आहे. प्रदूषित हवेचा हृदयविकार, श्वसनाचे आजार आणि कर्करोगाशी जवळचा संबंध आहे. हवेत विरघळणारे विष प्रत्येक वयोगटातील लोकांच्या आरोग्यासाठी घातक ठरत आहे. मुलांमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे हवेतील हानिकारक पदार्थ. हवेतील प्रदूषित कणांच्या वाढीमुळे मुलांच्या नैसर्गिक विकासावरही परिणाम होतो, त्यामुळे जन्मापासूनच मुलांमध्ये शारीरिक-मानसिक विकृती निर्माण होतात. एवढेच नाही तर हवेत विष विरघळल्याने महिलांच्या गर्भपाताचे प्रमाणही वाढले आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की हवेची गुणवत्ता आणि गर्भवती आणि नवजात बालकांचे आरोग्य यांचा जवळचा संबंध आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि पब्लिक हेल्थ फाउंडेशन ऑफ



इंडिया, इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्युएशन यांनी काही वर्षांपूर्वी केलेल्या 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज' अभ्यासातील डेटा स्पष्टपणे दर्शवतो की पाच वर्षाखालील मुलांमधील फुफ्फुसाच्या संक्रमणाला वायू प्रदूषण हे एक महत्त्वाचे कारण आहे. विशेष म्हणजे, आजही श्वसनाचे आजार आणि न्यूमोनिया हे भारतातील बालकांच्या मृत्यूचे सर्वात मोठे कारण आहेत. मुलांचे अत्यंत संवेदनशील अवयव अतिप्रदूषणाचा प्रभाव सहन करू शकत नाहीत. त्यामुळे ते लवकर अनेक आजारांना बळी पडतात. आजच्या बदलत्या जीवनशैलीत प्रदूषण फक्त बाहेरच आहे असे नाही तर घराच्या आतही ते मोठ्या प्रमाणात आहे. दोन्ही ठिकाणचे वायुप्रदूषण गर्भवती व नवजात बालकांसाठी जीवघेणे ठरत आहे. थंडीत परिस्थिती आणखीनच बिघडते. राजधानी दिल्ली-एनसीआरमध्ये प्रदूषणामुळे शाळा बंद झाल्याच्या आणि मुलांच्या आरोग्याच्या समस्यांमध्ये अचानक वाढ झाल्याच्या बातम्या दरवर्षी येत असतात. हे देखील विचारात घेण्यासारखे आहे की बदलत्या सामाजिक-कौटुंबिक स्थितीचा देखील गर्भात वाढणाऱ्या मुलांच्या परिस्थितीशी आणि प्रदूषणाशी संबंधित आहे. अलीकडच्या काळात उशिरा लग्न करून मोठ्या वयात आई होण्याचा ट्रेंड वाढला आहे. त्यामुळे न जन्मलेल्या बालकाच्या आरोग्याशी निगडीत धोकेही वाढले आहेत. नेचर कम्युनिकेशनमध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनात शास्त्रज्ञांनी असेही म्हटले आहे की, प्रदूषित हवा वृद्ध महिलेच्या पोटात वाढणाऱ्या बाळासाठी अधिक धोकादायक ठरत आहे. नवीन पिढीच्या हाती हवा आणि पाण्याची स्वच्छता हा आपल्या प्राधान्यक्रमात असायला हवा होता, पण दम घोटणाऱ्या हवेमुळे त्यांचा जीव धोक्यात येत आहे हे खेदजनक आहे. केवळ भारतातच नाही, तर जगभरातील विकासाच्या गतीसमोर, जीवनबचतीशी संबंधित मानकांकडे दुर्लक्ष केल्याने जीवन विस्कळीत होत आहे. विकासाला गती देण्यासाठी दळणवळण, वाहतूक आणि उद्योग या सर्व गोष्टी आवश्यक आहेत हे खरे असले तरी देशातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी हवा आणि संपूर्ण वातावरण स्वच्छ ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. अंदाधुंद जंगलतोडीपासून ते रस्त्यावरील वाढत्या वाहनांच्या संख्येपर्यंत आणि सोयी-समृद्ध जीवनशैलीमुळे विकसनशील देशांतील दाट लोकवस्तीच्या शहरांमध्ये परिस्थिती बिकट झाली आहे. प्रत्येक वयोगटात आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. विशेष म्हणजे भारतात वायू प्रदूषणामुळे दरवर्षी लाखो लोकांचा जीव जातो आहे. हवेत विरघळणाऱ्या विषारी घटकांमुळे आज मोठी लोकसंख्या दमा, हृदयविकार, कर्करोग, त्वचारोग आदी आजारांनी ग्रस्त आहे.

जर आपल्या देशाने हवेच्या गुणवत्तेच्या मानकांची पूर्तता करण्यासाठी आपले लक्ष्य सुधारले तर 66 कोटी लोकांचे आयुर्मान 3.2 वर्षांनी वाढेल. अशा परिस्थितीत वयाची मोजणी सुरू होण्यापूर्वीच निरपराधांचे जीव हिरावून घेणे ही भीषण परिस्थिती दर्शवते. प्रदूषित हवेमुळे भावी पिढ्या एकतर गर्भातच जीव गमावत आहेत किंवा आजार सोबत घेऊन जगात येत आहेत, ही खेदाची बाब आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की युनिसेफच्या 'द क्लायमेट क्रायसिस इज अ चाइल्ड राइट्स क्रायसिस - इंट्रोड्यूसिंग द चिल्ड्रन्स क्लायमेट रिस्क इंडेक्स' या अहवालात गेल्या वर्षी मुलांवर लक्ष केंद्रित करून अशा अनेक धोक्यांचा इशारा दिला होता.
या अहवालानुसार हवामान बदलामुळे नव्या पिढीचे आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षेला गंभीर धोका आहे. दक्षिण आशियातील चार देशांत भारताचाही समावेश आहे ज्यांना बालपणीच्या संसर्गाचा उच्च धोका आहे. एवढेच नाही तर प्रदूषणामुळे मुलांच्या बौद्धिक क्षमतेवरही परिणाम होत आहे. हे स्पष्ट आहे की वाढत्या आरोग्य समस्या, शाळा बंद करणे आणि प्रदूषित हवेमुळे होणारे आजार हे गंभीर धोक्याचे लक्षण बनत आहेत. अशा परिस्थितीत उद्योग आणि वाढत्या वाहनांमधून आणि घरगुती कामासाठी उत्सर्जित होणारे विषारी वायू कमी करण्यासाठी ठोस आणि व्यावहारिक उपाय शोधणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेने असेही म्हटले आहे की वाढत्या वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी भारतामध्ये किफायतशीर मार्गांमध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. सर्वसामान्यांनी आपली जीवनशैली बदलून सुविधा गोळा करण्याऐवजी मुलांना स्वच्छ वातावरण देण्याचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच, प्रशासकीय आघाडीवर दोषारोप करण्याऐवजी गुदमरणारी हवा बाहेर काढण्याचा मार्ग शोधला पाहिजे. हे समजून घेणे फार महत्वाचे आहे की कोणत्याही प्रकारच्या विकासाचा अर्थ मानवी जीवनापेक्षा जास्त नाही.

# इराणमध्ये अखेर नारी शक्तीचा विजय !



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**इराणमध्ये हिजाबच्या विरोधात महिलांनी रस्त्यांवर उतरून उग्र आंदोलने केली. ही आंदोलने जगभर चर्चिली गेली कारण इराणमध्ये हिजाब संदर्भात खूप कठोर नियम आहेत. इराण हे कट्टरपंथी इस्लामी राष्ट्र असल्याने तेथील महिलांसाठी कठोर ड्रेस कोड आहेत. १९७९ साली इराणमध्ये इस्लामी क्रांती झाली तेंव्हापासून तिथे महिलांच्या ड्रेस संदर्भात कठोर नियम आहेत. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या महिलांना थेट अटक करून तुरुंगात डांबले जाते. योग्य प्रकारे हिजाब घातला नाही या कारणाने आजवर लाखो महिलांना आरोपी ठरवले गेले असून शेकडो महिलांना अटक करण्यात अली. हिजाबच्या कठोर नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी एका २२ वर्षीय मुलीला पोलिसांनी अटक केली.**

पोलीस कोठडीत असतानाच त्या मुलीचा मृत्यू झाला. त्या मुलीचा मृत्यू हृदय विकाराच्या झटक्याने झाला असे तेथील पोलिसांकडून सांगण्यात येत असले तरी पोलिसांच्या मारहाणीतच त्या मुलीचा मृत्यू झाला असल्याचे तेथील महिलांचे मत आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी इराणमधील महिला रस्त्यांवर उतरून आंदोलने करू लागली. या आंदोलनात महिलांनी कठोर हिजाब निर्बंधांना देखील विरोध केला. कठोर हिजाबच्या विरोधात इराणची राजधानी असलेल्या तेहरान या शहरासह सर्वच महत्वाच्या शहरात महिलांनी आंदोलने केली. कुरदीस्तान या शहरात आंदोलन चालू असताना सुरक्षा रक्षकांनी केलेल्या गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाला. या गोळीबारानंतर हे आंदोलन आणखी तीव्र होत गेले. इराणमध्ये हिजाब विरोधातील हे पहिलेच आंदोलन नव्हते २०१९ मध्येही इराणमध्ये अशाप्रकारचे आंदोलने झाले होते. यावेळी मात्र हे आंदोलन खूप तीव्र झाले असून महिला हिजाब सोबतच तेथील हुकूमशाही सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरून घोषणा देत आहेत. इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रायसी हे इस्लामचे तज्ञ मानले जातात आणि शरिया कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यावर विश्वास ठेवतात. ते हे आंदोलन कशाप्रकारे हाताळतात याकडे सपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. सुरवातीला इराण सरकारने हे आंदोलन मोडून काढण्यासाठी कठोर भूमिका घेतली. पोलीस बळाच्या वापर केला मात्र महिला आंदोलांकर्त्या डगमगल्या नाहीत. या आंदोलनाला अमेरिका आणि इस्राईल यांची फूस असल्याचाकांगावा देखील इराणने केला मात्र त्याचाही काही उपयोग झाला. हिजाबविरोधातील हे आंदोलन काहीही करून थांबायचे नाव घेत नसल्याने अखेर इराण सरकारला नारी शक्तीपूढे झुकावे लागले. इराणचे महाधिवक्ता मोहम्मद जफर मोताजेरी यांनी म्हटले आहे की हिजाब सक्ती रद्द करण्या संदर्भात न्यायपालिका आणि संसद विचार करत आहेत. हिजाब संबंधी कायद्यात बदल करण्याची आवश्यकता आहे का, असा विचार सुरू आहे. सरकार हिजाब सक्तीमागे घेण्याच्या विचारात आहे असे इराण सरकारच्या वतीने सांगण्यात आले ही मोठी ऐतिहासिक घटना आहे. महिला शक्तीसमोर जगातील कितीही मोठ्या शक्तीला झुकावेच लागते हेच इराणच्या महिलांनी दाखवून दिले आहे. इराण सारख्या कट्टरपंथी देशातील सरकारला नारी शक्तीपूढे झुकावे लागणे हा नारी शक्तीचा मोठा विजय आहे!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सीमावादाचे हिंसक वळण



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**सीमावादाचे हिंसक वळण पहाता दोन्ही राज्यांत ताबडतोब राष्ट्रपती राजवट लावावी. सीमा विवादाचे रूपांतर हिंसक वळण घेत आहे व राजकीय पुढारी आप-आपली पोळी शेकत आहे.याचा दुष्परिणाम दोन्ही राज्यांतील जनतेला भोगावा लागत आहे.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांचे तोंड बंद करण्यासाठी व सीमावाद संपुष्टात आणण्यासाठी दोन्ही राज्यांत राष्ट्रपती राजवट लावने अत्यंत गरजेचे आहे. राज्यांचा सीमावाद म्हणजे पुर्वजांचा घोर अपमान होय.गेल्या 10 दिवसांपासून कर्नाटक-महाराष्ट्र सीमाविवाद टोकाला गेल्याचे दिसून येते व आता यांचे रूपांतर हिंसक होत आहे.**

त्यामुळे दोन्ही राज्यांचे राजकीय पुढारी एकमेकांवर ताशेरे ओढतांना दिसतात. याचाच परिणाम म्हणजे बेळगावातील हिंसाचार होय. कर्नाटकातील बेळगावामध्ये महाराष्ट्राच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली. याचाच अर्थ असा की महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वाद विकोपाला जात असल्याचे स्पष्ट दिसुन येते. केंद्र सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की देशातील सीमावाद म्हणजे आपआपसात कटुता निर्माण करणे.महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद अनेक वर्षांपासून सुरू आहे.परंतु सध्याच्या परिस्थितीत सीमावाद हे बेळगावच्या माध्यमातून हिंसक वळण घेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सीमावाद हे घातक असल्यामुळे दोन्ही राज्यांत केंद्र सरकारने ताबडतोब राष्ट्रपती राजवट लावली पाहिजे.कारण सीमावाद म्हणजे आपसा-आपसात वाद निर्माण करने हे कृत्य फक्त राजकीय पुढारीच करीत आहे आणि हा राजकीय पुढाऱ्यांचा सर्वात मोठा गुन्हा आहे.त्यामुळे सीमावाद संपुष्टात आणण्यासाठी दोन्ही राज्यांत राष्ट्रपती राजवट लावने अती आवश्यक आहे.कारण राजकीय पुढारी वाटेल ते वक्तव्य देतात "उचल्ली जीभ लावली टाळ्याला"अशी परिस्थिती राजकीय पुढाऱ्यांची आहे.यामुळे दोन्ही राज्यांतील जनतेच्या भावना दुखावतात.राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की सीमा वाद निर्माण करण्यासाठी भारत देश स्वतंत्र झालेला नसून देशाला एकत्रित ठेवण्यासाठी स्वतंत्र झालेला आहे व यासाठी अनेकांनी बलीदान दिलेले आहे.भारत देश एक आहे आणि राहील यात दुमत नाही.परंतु देशातील राजकीय पुढाऱ्यांनी सीमा वादाचा तमाशा कशाला मांडायला हवा?सीमा विवाद निर्माण करून कर्नाटक व महाराष्ट्र सरकारने जगाला नवीन तमाशा दाखवु नये.कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई म्हणतात की सीमेच्या रक्षणासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.मी म्हणतो की कर्नाटक -महाराष्ट्र सीमा वाद म्हणजे भारत-पाकीस्तान किंवा भारत -चीन असा आहे का?



की राजकीय पुढारी धमकी देणारे वक्तव्य करीत आहे.देशातील संपूर्ण राज्याची रक्षा करण्याचे काम संपुर्ण भारतीयांचे आहे.त्यामुळे राजकारण बाजूला सारून सीमा वाद संपुष्टात आणला पाहिजे.देवेंद्र फडणवीस म्हणतात की बेळगाव हिंसाचार प्रकरण व सीमा वाद अमित शहा यांच्याकडे मांडणार आहेत.मी म्हणतो की सीमा वाद जास्त विकोपाला जात असेल तर याचा पर्याय म्हणजे दोन्ही राज्यांत राष्ट्रपती राजवट लावने.कारण आपल्या पुर्वजांनी भारत स्वातंत्र्यासाठी 150 वर्षे रक्ताचे पाणी करून इंग्रजांशी दोन-दोन हात करून कडवी झुंज दिला. त्यानंतर भारत 1947 ला स्वतंत्र झाला.यासाठी अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष शहिद झालेत. तेव्हाकुठे आपण मोकळा स्वास घेत आहोत.तरीही गोव्या सारख्या केंद्र शासीत प्रदेश पोर्तुगीजांच्या ताब्यात होता.गोवा ताब्यात घेण्यासाठी स्वातंत्र्यानंतर तब्बल 14 वर्षे लागली व 19 डिसेंबर1961 ला पोर्तुगीजांपासुन गोवा मुक्त झाला.अशाप्रकारे भारतात एक-एक राज्य सहभागी करण्यासाठी देशाला मेहनत घ्यावी लागली आणि आता फक्त राजकारणापोटी महाराष्ट्रा-कर्नाटक सिमा विवाद सुरू आहे.या विवादामध्ये काहीही तथ्य नाही.परंतु राजकीय पुढारी व पक्ष आपले राजकारण टिकवून ठेवण्यासाठी सिमा विवादचा ढिंढोरा सर्वसामान्यांसमोर मांडतांना दिसतात व हिंसाचार पसरवीत आहे.प्रत्येक राज्यात अनेक ज्वलंत प्रश्न आहेत यात बेरोजगारी, शिक्षण, शेतकऱ्यांच्या समस्या, विजेची समस्या,आरोग्य, पाण्याची समस्या, उद्योग अशा गोष्टींवर लक्ष देवून ते तत्परतेने सोडविले पाहिजेत जेणेकरून राज्यातील जनतेला समाधान मिळेल व विकास होईल. महाराष्ट्राने आजवर बेळगावसह इतर भाग मिळावेत यासाठी महाराष्ट्राने न्यायालयीन लढा दिला आणि सुरू सुध्दा आहे.परंतु कर्नाटकातील कोणताही भाग महाराष्ट्राला मिळाला नाही आणि मिळणार सुध्दा नाही.त्याचप्रमाणे कर्नाटकला महाराष्ट्रातील कोणतेही गाव मिळणार नाही.कारण हे सर्व नाटक राजकीय पुढारी सर्वसामान्यांची दिशाभूल करण्यासाठी व आपले राजकारण टिकवून ठेवण्यासाठी करीत असतात. काही दिवसांपूर्वी बसवराज बोम्मई यांनी राज्याचा सिमावाद किंवा कर्नाटकचा महाराष्ट्रातील 40 गावांनवरील दावा केला होता हा पुर्णपणे राजकीय प्रेरीत असल्याचे दिसून येते आणि ह्या सर्व घटना देशातील इतर राज्यांतील निवडणुका पाहून हा प्रश्न कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई मुद्दाम उपस्थित करीत असल्याचे वाटते. कर्नाटक-महाराष्ट्र सिमा विवाद म्हणजे भारत-पाकिस्तान किंवा भारत -चीन विवाद नाही ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.सध्याच्या परिस्थितीत प्रत्येक राज्यांनी आपापल्या राज्याच्या भागाचा विकास करावा व मागासलेली गावे दत्तक घ्यावी यातच खरी मानुसकी दिसून येईल.कर्नाटक व महाराष्ट्र सरकारने सिमा विवादाला जास्त चालना देवून दोन्ही राज्यांच्या नागरिकांच्या भावना दुखावु नये किंवा भडकवु नये.राज्यात सध्याच्या परिस्थितीत फक्त खोक्याचे राजकारण दिसून येते. त्यामुळे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना महाराष्ट्राकडुन 40 खोके तर पाहिजे तर नाही ना? अशी शंका निर्माण होत आहे.कारण आता सीमा वादाने हिंसक रूप धारण केले आहे. सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रात विकासापेक्षा खोक्याचेच राजकारण सुरू आहे.त्यामुळे कर्नाटक सरकारला स्वप्नात खोके तर दिसत नाही ना! अशी शंका निर्माण होत आहे.माझ्या मते देशातील कोणत्याही राज्याचा सीमा विवाद नकोच असेल तर तो सामंजस्याने सोडवीला पाहिजे जर यात राजकारण होत असेल तर ताबडतोब राष्ट्रपती राजवट लागू केली पाहिजे या मताचा मी आहे.देशातील प्रत्येक व्यक्ती भारत भ्रमण करतो अशा परिस्थितीत तो व्यक्ती प्रत्येक राज्यात व गावात जातो आणि त्याला प्रत्येक राज्यात मानसन्मान सुध्दा मिळतो मग कशाला हवा सीमा विवाद? त्यामुळे महाराष्ट्र व कर्नाटक सरकारला विनंती आहे की दोन्ही राज्यांनी सीमा विवादाकडे लक्ष न देता व हिंसाचाराचे गालबोट न लावता राज्याच्या व राज्यातील जनतेच्या विकासाकडे जास्तीत जास्त लक्ष दिले तर बरे होईल.असे जर होत नसेल तर केंद्र सरकारने दोन्ही राज्यांत ताबडतोब राष्ट्रपती राजवट लावावी.
लेखक.

# काळ्या मातीतलं सोनं : सर्वसमावेशक कविता!



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**पेशाने शिक्षक असलेले कवी दिगंबर जाधव यांच्या लेखणीतून साकारलेला, श्री दत्ता डांगे इसाप प्रकाशन, नांदेड यांनी प्रकाशित केलेला, आशयाशी निगडित असे मुखपृष्ठ संतोष घोंगडे यांनी चितारलेला 'काळ्या मातीतलं सोनं' हा कवितासंग्रह वाचण्यात आला. विषयाचे वैविध्य घेऊन आलेला हा संग्रह असला तरीही कवी जाधव यांच्या काव्याचा आत्मा शेतकरी आहे. हा काव्यसंग्रह आहे शेतकऱ्याचा, हा काव्यसंग्रह आहे बळीराजाचा, हा काव्यसंग्रह आहे कास्तकाराचा, हा काव्यसंग्रह आहे पोशिंद्याचा! तसेच या संग्रहात कवीने इतर विषयही तितक्याच समर्थपणे मांडले आहेत.**

कवी दिगंबर जाधव यांच्या सिद्धहस्त लेखणीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांना, ससेहोलपटीला, संकटांना, दारिद्र्याला, लुबाडणूकीला शब्दबद्ध करताना वाचाही फोडली आहे.जाधव यांच्या कवी मनाने उत्तम रीतीने बहरुन आलेली, डौलाने फडकणारी, फुलं-फळांनी. लगडलेली पिके जशी पाहिली आहेत, तशीच निसर्गाच्या कोपाने कधी वाहून गेलेले, कधी करपलेले तर कधी मातीमोल भावाने विकलेले धान पाहिले आहे तर मधूनच एखाद्या झाडावर चिरनिद्रा घेणारा शेतकरी बांधवही पाहिला आहे. कवी संवेदनशील मनाचा आहे, कवी परिस्थितीमुळे विचारशील आहे, कवी शिक्षक असल्यामुळे समाजमन जवळून पाहणारा आहे, दिसेल तशी शब्दांची पखरण करणारा आहे आणि म्हणून कवीचे शब्द जिवंत वाटतात. मनात घर करतात. कविता संग्रहात एकूण अठ्ठावण्ण कवितांचा समावेश आहे. दिगंबर जाधव यांच्या कवितेची पाठराखण सुप्रसिद्ध साहित्यिक फ.मु. शिंदे यांनी केली आहे त्यामुळे या संग्रहाला वेगळेच वजन प्राप्त झाले आहे तसेच संग्रहासाठी ख्यातकीर्त साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांची प्रस्तावना लाभली असल्यामुळे कविता संग्रहाला एक वेगळी उंची प्राप्त झाली आहे.

मनोगतात लिहिल्याप्रमाणे कवी जाधव यांची कवितेशी पहिल्या इयत्तेपासून नाळ जुळली आहे. अभ्यासक्रमातील कविता मुखोद्‌गत करणं निराळं आणि त्या कवितांची आवड निर्माण होऊन त्या गाऊन म्हणणं वेगळं! लहानपणापासूनच काव्यविश्वात रममाण झाल्यामुळे कवितेचा लागलेला लळा शिक्षक म्हणून पेशा स्वीकारल्यानंतर जास्तच वृद्धिंगत झाला. कवी कवितेच्या प्रेमात पडला आणि त्यांच्या लेखणीतून एका नंतर एक कवितांचे प्रसव होत गेले. घरी शेती असल्यामुळे आणि ग्रामीण भागात राहत असल्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन कविने जवळून पाहिले आहे आणि ते जीवन कवी जगला आहे, त्यातील सारेच अनुभव हृदयाच्या एका कोपऱ्यात जपून ठेवले आणि अस्वस्थ अशा अवस्थेत त्या अनुभवांना शब्दांत व्यक्त केले आहे. त्यामुळे लहानपणापासूनच कवितेशी जुळालेली नाळ आजही कायम आहे, दिवसेंदिवस घट्ट होत आहे. म्हणूनच त्यांची लेखणी 'शेतकरी' या कवितेत लिहिते...

***'आलं गेलं पीक तरी
सहन करतो तोटा
जिवंतपणी जाळतात
त्याला कर्जाच्या नोटा...***

सरकारी किंवा सावकारी कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांची दाहक स्थिती कवी अत्यंत नेमक्या शब्दात व्यक्त करतात. अगोदर वर्णन केल्याप्रमाणे या संग्रहात कविने इतरही अनेक विषयांवर मार्मिकपणे भाष्य केले आहे. नेत्रदान, मराठवाडा मुक्ती संग्राम, संत कबीर, एकलव्य, रामायण, संत तुकाराम, जवान, भीष्माचार्य, महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज असे अनेकानेक विषय, महात्मे याबद्दलची कृतज्ञता कवी व्यक्त करताना दिसतात. छत्रपती शिवरायांविषयी त्यांच्या भावना समाजाला अनुकरणीय आहेत...

***जातीपातीला नव्हता थारा
छत्रपतींच्या विशाल मनी
भारत देशाच्या इतिहासाची
आदर्श हीच सत्य कहाणी***

शिवाजी महाराज यांच्यासह जिजाऊ, डॉ. आंबेडकर, फातीमाबी अशा थोर मानवांचा लेखक भक्तिभावाने उल्लेख करतात...

***सुखदुःखाचे दिवस झेलले
निधड्या छातीवरी
जिजाऊंचे नाव अजरामर
राहणार भारत भूमीवरी***

कविचे मन आणि लेखणी दोन्ही सामाजिक जाणिवांना सढळ हाताने शब्दरुप देतात. नेत्रदान या आशयगर्भ कवितेतील शब्द याची साक्ष देतात...


***मृत्यूनंतर नेत्रदान करूनी
न्याय द्याल का डोळ्याला
अमावास्येच्या काळ्या रात्रीत
प्रकाशमान कराल का चंद्राला***

नेत्रहीन मानव म्हणजे जणू चंद्र ही उपमाच कवी दिगंबर यांच्या शब्द प्रभूत्वाला उजागर करते.

निजामाच्या बंधनातून मराठवाडा विभागास मुक्त करण्यासाठी हजारो नागरिकांनी जिवाची बाजी लावली आणि मराठवाड्याचे स्वातंत्र्य मिळविले. ह्या जुलमी राजवटीविरूद्ध दिलेल्या लढ्याचे वर्णन....

***रझाकारास कंटाळुनी
राहिलो आम्ही रानीवनी
निजामाला पळवून लाविले
कीर्ती स्वातंत्र्यसैनिकांची पानोपानी***

हुंडाबळी ही आपल्या समाजजीवनाला लागलेली एक कीड आहे. हुंड्यासाठी किती लेकीबाळींचा जीव क्रुरतेने घेण्यात आला याची मोजदाद कुणी करावी, मातेला केवळ हुंड्यासाठी यमसदनी पाठविताना तिला असणाऱ्या तान्हुल्याचा विचार का कुणी केलाय. अशा कमनशिबी मातेची शेवटची इच्छा, केविलवाणी धडपड कवी निर्भीडपणे मांडताना दिसतात...




***शेवटची इच्छा माझी
अश्रू पुसून घ्यावे
चितेवर रांगते बाळ
छत्र त्यास द्यावे***

पाऊस! शेतकऱ्यांचा मित्र आणि प्रसंगी शत्रूही! कधी हसवणारा, कधी रडवणारा. पावसाच्या लहरीपणामुळे हवालदिल झालेल्या पोशिंद्याची हृदयादावक स्थिती 'पाऊस' या कवितेत उत्कटतेने व्यक्त झाली आहे. या कवितासंग्रहाच्या शीर्षक स्थानी असलेल्या 'मातीतलं सोनं' या कवितेत शेतात धान पिको अथवा न पिको, शेतकऱ्यांचा जीवनपट मांडताना कवी लिहितो,

***कितीही वाईट काळात बापाची
तुटत नाही मातीची नाळ
निरक्षर असूनही साक्षरासारखं
टाकीत नाही कुणालाही वाळ***

मुलीचा गर्भ पाडून टाकण्याचे दुष्कृत्य करणारांची संख्या कमी नाही. शिक्षा होऊनही इतरांचे डोळे उघडत नाहीत. हाच धागा पकडून कवी 'लेक' या कवितेत मुलीच्या गर्भाचे मनोगत सांगतात...

***मलाही वाटते बांधावी राखी
जिवलग माझ्या भावाला आई
दुनियेमध्ये येण्याआधी
मारून टाकतात मला का बाई?***

'बाप' ही कविता अत्यंत हृदयस्पर्शी आहे. मुलांसाठी मोठं स्वप्न पाहणाऱ्या पण प्रत्यक्ष ते वैभव पाहण्याचे नशीब न लाभलेल्या कास्तकारासाठी योजिलेली शब्दरचना डोळे पाणावल्याशिवाय राहत नाहीत...

***काय सांगू मी तुम्हा
माझ्या बापाची
कहाणी
भरलेल्या
विहिरीवाणी
रात्रंदिनी डोळ्यांत पाणी***

संग्रहातील 'झोपडी' ही कविता वाचताना सहजगत्या संत तुकडोजी महाराज यांच्या 'या झोपडीत माझ्या...' या कवितेची आठवण आल्याशिवाय राहत नाही..

***झोपडीने पाहिले या
कैकवेळा वारा पाणी
वादळातही उभी आज
ताठ आमची आश्रयदानी...***

आपल्या समाजजीवनात अनेक प्रश्न जसे न सुटणारे आहेत तसेच त्रासदायक आणि जीवघेणे आहेत. बलात्कार ही या समाजजीवनाला लागलेली विकृत कीड आहे. समाजभान जागृत असणाऱ्या दिगंबर जाधव या कविलाही ही समस्या स्वस्थ बसू देत नाही. या समस्येने हवालदिल झालेले कवी 'जखमी वाघीण' ह्या समाजाच्या डोळ्यात अंजन घालणाऱ्या कवितेत म्हणतात...

***बलात्काराच्या विरोधात
वज्रमुठीनं लढलं पाहिजे
अशा नाजूक मुद्यांवरती
राजकारण करणं सोडलं पाहिजे***

मातीतलं सोनं ह्यातील कविता आशयगर्भ, अनेकानेक समस्यांना वाचा फोडणाऱ्या, साध्या, सरळ भाषेत लिहिलेल्या असल्यामुळे त्या वाचनीय, विचारणीय आणि चिंतनीय आहेत. लेखकाचा हेतू प्रामाणिक नि सामाजिक बांधिलकी जपणारा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ही कविताही तशीच चिंतनशील आहे. या कवितेतील काही ओळी...

***नको आम्हाला पंचपक्वान्न
प्रसंगी खुशीनं उपवास धरू
खोल पोटाच्या गायीसारखं
गोठ्यात आनंदानं रवंथ करू
तुमच्या आशीर्वादाचं चौकोनी
कुंपण फक्त मोडू नका
कितीही झालं कर्ज तरी
बाबा, आत्महत्या तुम्ही करू नका***

**मातीतलं सोनं :- काव्यसंग्रह
कवी :- दिगंबर बापुराव जाधव
कळमनुरी, हिंगोली
प्रकाशक:- दत्ता डांगे
इसाप प्रकाशन, नांदेड
पृष्ठसंख्या:- १०४
किंमत:- २००/-
आस्वादक : नागेश सू. शेवाळकर,
पुणे, (९४२३१३९०७१)**

# सीमावाद उकरून महाराष्ट्र तोडण्याचे भाजपाचे कारस्थान

## नाना पटोले : केंद्र सरकार व उद्योगपतींच्या इशाऱ्यावर कर्नाटकच्या कुरापती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सीमाभागात कर्नाटकातील भारतीय जनता पक्षाचे सरकार जाणीवपूर्वक वातावरण बिघडवत असून मराठी लोकांना मारहाण करुन त्यांच्या संपत्तीचे नुकसान केले जात आहे. महाराष्ट्राची जनता कर्नाटकची दादागिरी सहन करणार नाही, महाराष्ट्राने संयमाची भूमिका घेतली आहे पण आमचा संयम सुटला तर कर्नाटक व केंद्र सरकारला त्याचे परिणाम भोगावे लागतील असा इशारा देत सीमावाद उकरून काढून महाराष्ट्र तोडण्याचे भाजपाचे षडयंत्र आहे, आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. टिळक भवन येथे पत्रकारांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भारतीय जनता पक्षाचा खरपूस समाचार घेतला, ते पुढे म्हणाले की, सीमा भागात कर्नाटकाकडून होत असलेले हल्ले गंभीर असून आम्ही या भ्याड हल्ल्यांचा निषेध करतो. केंद्रातील मोदी सरकार व काही उद्योपतींच्या इशाऱ्यावर कर्नाटक अशा कुरापती काढत आहे. वास्तविक पाहता दोन राज्यात वाद उद्‌भवल्यानंतर केंद्र सरकारने हस्तक्षेप करुन तो सामोपचाराने सोडवला पाहिजे पण तसे होताना दिसत नाही. कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई दररोज भडकाऊ विधाने करत आहेत पण महाराष्ट्र सरकारकडून त्याला उत्तर दिले जात नाही. महाराष्ट्रात सरकार आहे की नाही असे वाटावे अशी परिस्थिती आहे. आपण मोदी-शहा यांचे हस्तक आहोत हे मुख्यमंत्री शिंदे यांनी आधीच जाहीर करून टाकले आहे त्यामुळे त्यांच्याकडून काही अपेक्षा नाहीत पण महाराष्ट्राची जनता व काँग्रेस पक्ष कर्नाटकची दादागिरी सहन करणार नाही, वेळ पडली तर आम्ही जशास तसे उत्तर देऊ.धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी भाजपा सरकारने शेकडो एकर मोलाची जमीन ५ हजार कोटी रुपयांना एका उद्योगपतीच्या घशात घातली आहे. यासाठी कोणती टेंडर प्रक्रिया पार पाडण्यात आली. कशाच्या आधारावर एवढी मोलाची जमीन देण्यात आली? राज्य व केंद्र



सरकारने इतक्या अचानकपणे ही प्रक्रिया कशी पार पाडली? धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी दुबईच्या सी-लिंक कंपनीने ७ हजार ५०० कोटी रुपयांची निविदा भरली होती पण नंतर सरकरने ती रद्द केली. ह्या पाठीमागे काय गौडबंगाल आहे? आणि आता ५ हजार कोटी रुपयांना एका उद्योगपतीला ह्या प्रकल्पाचे काम कसे काय दिले? महाराष्ट्र सरकारने रेल्वेच्या जमिनीसाठी ७०० कोटी रुपये दिले होते पण त्यावेळी रेल्वेने महाराष्ट्र सरकारला जमीन दिली नाही, आता असे काय घडले की ही जमीन राज्य सरकारला दिली? याची उत्तरे जनतेला दिली पाहिजेत. हिवाळी अधिवेशनात सरकारला आम्ही या प्रश्नी जाब विचारणार आहोत. मुंबईतील मोक्याच्या जमिनी या उद्योगपतीला देऊन मुंबई लुटण्याचे भारतीय जनता पक्षाचे डाव आहे. मुंबई विमानतळही याच उद्योगपतीच्या घशात घातले आहे. उद्या मुंबईतील कोळीवाड्याची मोक्याचा जागा सुद्धा भाजपा या उद्योगपतीच्या घशात घालू शकते. केंद्रातील व राज्यातील भाजपा सरकार हे सर्वकाही उद्योपतीच्या हितासाठी करत आहेत. धारावीचा प्रश्न अत्यंत महत्वाचा असून १७ तारखेच्या मोर्चात धारावीचा मुद्दाही असावा यासाठी मविआच्या बैठकीत चर्चा करु. राज्यातील आजची परिस्थिती व राज्य सरकारची भूमिका पाहता ईडी सरकार हे मराष्ट्रातील आतापर्यंतचे सर्वात दळभद्री सरकार आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.



# महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनिरुद्ध गोपनारायण यांच्या वतीने एक पेन वही वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** आज दि.०६ डिसेंबर २०२२ रोजी शाळा व्यवस्थापन समितीचे सन्माननीय अध्यक्ष मा.अनिरुद्ध रमेश गोपणारायन यांच्या वतीने नवथळ येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने "एक पेन एक वही मोहिमेंतर्गत" प्रत्येकी एक वही आणि पेन देऊन खऱ्या आर्थने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना दिली, यावेळी शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष सचिव तसेच मुख्याध्यापक मा.प्रमोद फुलसंगे, शिक्षक हर्षल दौंड, गजानन तेलगोटे, नामदेव तेलगोटे आणि गावकरी, विद्यार्थी उपस्थित होते.

अनिरुद्ध गोपणारायन हे अश्या प्रकारच्या उपक्रमातून नेहमीच विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत होईल असे कार्यक्रम आयोजित करीत असतात.

# लढता लढता कोरानाशी.. रक्ताळल्या प्रकाशवाटा..! पुस्तक प्रकाशित

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ. मोहन दिवटे लिखित लढता लढता कोरानाशी.. रक्ताळल्या प्रकाशवाटा..! या पुस्तकाचे प्रकाशन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या हस्ते प्रकाशगड येथील मुख्यालयात आज करण्यात आले. डॉ. दिवटे यांनी लिहिलेले लढता लढता कोरानाशी.. रक्ताळल्या प्रकाशवाटा..! हे पुस्तक (कादंबरी) महावितरणच्या सकारात्मक कामगिरीचे प्रदर्शन करणारे असून रामभाऊ हा गुणी जनमित्र या कादंबरीचा नायक आहे. हे पुस्तक वान्या पब्लिकेशन्स कानपूरद्वारे प्रकाशित करण्यात आले आहे. या प्रकाशन कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले. या कार्यक्रमास संचालक (संचालन) संजय ताकसांडे, संचालक (वित्त) रविंद सावंत, संचालक (प्रकल्प/मानव संसाधन) प्रसाद रेशमे, लेखक डॉ. दिवटे यांच्यासह सर्व कार्यकारी संचालक व सर्व मुख्य अभियंते व विभागप्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. दिवटे हे महावितरणच्या लातूर परिमंडल येथे जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.



# आ. प्रशांत बंब मित्र मंडळातर्फे खुल्या टेनिस बॉल स्पर्धा



आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** मंगळवार रोजी आमदार प्रशांत भाऊ बंब मित्र मंडळातर्फे सरपंच चषक भव्य खुल्या टेनिस बॉल स्पर्धा आयोजित करण्यात आले.

या स्पर्धामध्ये प्रथम बक्षीस मीनाताई संजय पांडव यांच्या तर्फे 51000 हजार व द्वितीय बक्षीस नारायण भाऊ वाकळे यांच्या तर्फे 31000 तर तृतीय बक्षीस प्रतीक भैय्या चंडालिया तर्फे 21000 हजार देण्यात आले लासुर नगरीचे प्रथम नागरिक सौ. सरपंच मीनाताई संजय पांडव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली या वेळी लासूर स्टेशन येथील माजी सरपंच बंडू नाना भुजबळ, प्रीतम भैय्या मुथा, नारायण भाऊ वाकळे, रझाक पठाण संजय पांडव, रवी चव्हाण, प्रतीक भैय्या चंडालिया, गणेश व्यवहारे, सुरेश जाधव ,राजू गायकवाड,अशोक सौदागर, भगवान गाढे, प्रकाश कोकरे ,कल्याण पवार उपस्थित होते.

# महावितरणच्या मुख्यअभियंतापदी तालेवार रुजू

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या औरंगाबाद



परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून सचिन तालेवार यांनी बुधवारी कार्यभार स्वीकारला. मूळचे नागपूर जिल्ह्यातील सचिन तालेवार यांचे शालेय शिक्षण छिंदवाडा (मध्य प्रदेश) येथे झाले आहे. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केली आहे. तसेच गुरुग्राम येथील (MDI) मॅनेजमेंट डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूटमधून एनर्जी मॅनेजमेंटमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम 2007-08 मध्ये पूर्ण केला आहे. तालेवार हे 1997 मध्ये तत्कालिन विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून एचव्हीडीसी 500 केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्र चंद्रपूर येथे रुजू झाले. याच ठिकाणी पदोन्नतीनंतर सहाय्यक अभियंता म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यानंतर सरळसेवा भरतीमध्ये श्री. तालेवार यांची 2006 ला कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. या पदावर त्यांनी वर्धा, नागपूर व जालना येथे काम केले आहे. 2016 मध्ये सरळसेवा भरतीत त्यांची अधीक्षक अभियंतापदी निवड झाली. लातूर येथे या पदावर त्यांनी काम केले. 2018 च्या सरळसेवा भरतीत तालेवार यांची मुख्य अभियंतापदी निवड झाली. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून त्यांनी नोव्हेंबर-2022 पर्यंत यशस्वीरीत्या काम केले. नुकतीच त्यांची औरंगाबाद परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी बदली झाली.

# चित्रा क्षीरसागर यांची बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या गोवा विभाग सचिवपदी नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** येथील साहित्यिक व कवयित्री आणि सामाजिक



कार्यकर्त्या चित्रा प्रकाश क्षीरसागर यांची बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या गोवा विभागीय कार्यवाह म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बेळगाव येथे अलीकडेच झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**चित्रा क्षीरसागर यांचा अल्पपरिचय :**

चित्रा प्रकाश क्षीरसागर यांचा कवितेचे झाड हा कविता संग्रह प्रकाशित असून त्याला होंडा सत्तरी येथील कुलकर्णी प्रतिष्ठानचा पुरस्कार मिळाला आहे. बचत गटातून कर्ज घेऊन उद्योजिका बनलेल्या महिलांच्या कार्यावर आधारित भरारी हे पुस्तकही प्रकाशित आहे. त्याशिवाय जीवनातील वेचक मोती आणि संचित अनुभवांचे हे दोन लेखसंग्रहही प्रकाशित आहेत.

त्याशिवाय त्यांनी इंद्रधनुष्य हे गोव्यातील कथाकारांच्या कथांचा संग्रह संपादित केला असून तसेच गोमंतकीय कवयित्रींच्या कवितेची समीक्षा हा ग्रंथही संपादित केला आहे. जळाचा जाळ न व्हावा हा त्यांचा आगामी कवितासंग्रह आहे.

गोमंतकीय कवी विष्णू सूर्या वाघ यांच्या समग्र साहित्याची चिकित्सा हा ग्रंथही त्या संपादित करीत आहेत, सन्मान - हिमाचल प्रदेशची राजधानी येथील राजभवनात राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी आमंत्रित केले होते. गोव्याचे राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लाई यांची साहित्यिक भेटही त्यांनी घेतली आहे. दिल्लीच्या केंद्रीय साहित्य अकादमीमध्ये त्यांनी कवितावाचन केले आहे. त्यांना जळगावच्या अंकुर साहित्य संघ, गुंफण अकादमी कऱ्हाड, महाप्रस्थ जेसी आदी पुरस्कारही मिळाले आहेत. सामाजिक कार्यासाठी त्यांना गोवा मोटार सायकल टॅक्सी पायलट संघटना, साने गुरुजी कथामाला सोलापूरस बेळगावची शिक्षक विकास परिषद,गोमंतक साहित्य सेवक मंडळ, पणजी, दलित सेवा संघटना असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. दै. लोकमतचा ऋतूरंग पुरस्कार, दै. गोमन्तक पुरस्कार आदी पुरस्कारही मिळाले आहेत. गोमंतक साहित्य सेवक मंडळ, कोकण मराठी परिषदेच्या त्या सचिव आहेत, लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनच्या व गोवा लाईव्हलीहूड संस्था, आशा महेलच्या कार्यकारिणी सदस्य आहेत. अखिल भारतीय महिला परिषदेच्या त्या माजी सचिव व उपाध्यक्ष आहेत. पणजी शिमगोत्सव समितीवर त्या कार्यकारिणी सदस्य आहेत. डोंबिवली आणि यवतमाळ येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात त्या निमित्रित कवयित्री म्हणून सहभागी झालेल्या आहेत. मराठवाडा साहित्य संमेलनात त्या परभणी, अंबाजोगाई व उदगीर येथे निमंत्रित कवयित्री होत्या. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सावंतवाडीत झालेल्या कवयित्री साहित्य संमेलनात त्या सहभागी झाल्या होत्या. गोव्यातील सर्वच साहित्य संमेलनात त्या निमंत्रित असतात. बेळगाव येथे झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष मिलिंद महाजन होते. प्रधान कार्यवाह दिलीप कुंभोजकर हेही यावेळी उपस्थित होते. या बेठकीनंतर राज्य मराठी विकास संस्था, मुम्बईचे संचालक संजय कृष्णाजी पाटील, कार्यासन अधिकारी गिरीष पतके ह्यांचे सोबत संस्था संवाद व मराठी परीक्षा केंद्र प्रमुख ह्यांची संयुक्त बैठक झाली सायंकाळी बेळगावच्या मराठी पाउल पडते पुढे हा सांगितिक कार्यक्रम सादर झाला अनिल चौधरी व नितीन कपिलेश्वरकर यांनी या कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

# शेकापूर येथे महात्मा फुले विद्यालयात पर्यवेक्षक रामराव वरपडे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा

आधुनिक केसरी न्यूज



**कंधार :** शेकापूर येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पर्यवेक्षक रामराव वरपडे यांचा सेवापुर्ती सत्कार सोहळा निमित्त सपत्नीक जोड आहेर देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य नांदेड संभाजीराव पा. केंद्रे तसेच शिवसेना नेते मुक्तेश्वरभाऊ धोंडगे तसेच मा. शिक्षण संचालक म.रा पुणे प्रा.डॉ. गोविंद नांदेडे आणी अति.मुख्यकार्यकारी अधिकारी शिवाजीराव कपाळे व जिल्हा परीषद सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर त्यांच्या सोबत भगिनी जि.प.सदस्या प्रणिताताई देवरे ,संस्थेच्या उपाध्यक्षा मा.सौ. तारामतीबाई केंद्रे, कृषीअधिकारी नारायण गुट्टे , प्रा.डॉ.व्यंकटराव मुंडे , विकास अधिकारी एल.आय.सी.सिडको नांदेडज्ञानेश्वर थेटे तसेच संस्थेचे सचिव व शेकापूर नगरीचे सरपंच शिवाजीराव पा.केंद्रे आणि संस्थेच्या कोषाध्यक्षा डॉ. गंगासागर गित्ते, कंधार कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य अंगदराव केंद्रे, नगरध्यक्षा अनुराधा केंद्रे, प्राचार्य किशनराव डफडे, सरपंच शेकापूर सौ. मिराबाई संजय भुस्कटे, संगमवाडीच्या सरपंच चांगुनाबाई घुगे, सरपंच बाळासाहेब गर्जे, प्राचार्य मोतिभाऊ केंद्रे, या कार्यक्रमाचे सत्कारमुर्ती पर्यवेक्षक रामराव वरपडे व त्यांच्या पत्नी सौ.लीलाताई रामराव वरपडे यांचा सपत्नीक जोड आहेर देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सर्वांचे लाडके प्राचार्य मोतीभाऊ केंद्रे यांनी प्रास्ताविक सादर करीत आसतांना म्हणाले की, सत्कारमुर्ती रामराव वरपडे सर यांनी नेहमी कार्य तत्पर राहून शाळेची सेवा निस्वार्थ पणे केली आणि नेहमी अध्यापन मनोरंजक पध्दतीने कले असे विचार त्यांनी व्यक्त केले. पुढे बोलताना मुक्तेश्वर धोंडगे म्हणाले की वरपडे सरांनी 34 वर्षे सेवा केली पण यापुढची कार्यकिर्द कोणत्या पक्षासोबत राहील असे शब्द टाकुन राजकीय टोले बाजी केली व पुढील समाजाची सेवा करावी. तसेच मा.खा.प्रतापराव पाटिल चिखलीकर साहेब यांच्या कन्या प्रणिताताई देवरे चिखलीकर म्हणाल्या की वरपडे सरांनी शैक्षणिक कार्य खुप चांगले केले तसेच गणितामधील भुमिती सारखा कठीण विषय सोप्या पदतीने अद्यापन करून गणित विषयाची गोडी निर्माण केल्यामुळे तोंड भरून कौतुक केले यापुढची वरपडे सरांची नवीन खेळी भाजपा सोबत असेल असे त्या म्हणाल्या.

यावेळी शिक्षण संचालकगोविंद नांदेडे म्हणाले की मा. संभाजीराव पाटील केंद्रे साहेब हे महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या स्वपनांची पुर्तता करण्यासाठी ग्रामिण भागात संस्थेची उभारणी करून गोर गरीब विध्यार्थांचा शैक्षणिक विकास साधण्याचे कार्य केले. आजपर्यंत त्यांचे सर्व कामे अहींसेच्या पध्दतीने केले तसेच विध्यार्थांनी जास्तीचा अभ्यास करून उच्च पदावर जाण्याच्या शुभेच्छा दिल्या. तत्कालीन परीस्थितीत शेकापूर येथील महात्मा फुले शाळेत विज्ञान प्रदर्शन स्पर्धेच्या वेळी 1200 मुंलाना निवासी राहाण्याची व जेवणाची मोफत सुविधा केल्यामुळे जवळपास 700 ते 800 विध्यार्थी शासकीय कर्मचारी व अधिकारी पदावर रूजु झाले म्हणुन प्राचार्य मोतिभाऊ केंद्रे यांचे शब्द सुमनानी तोंड भरून कौतुक केले आणि चिकीत्सक व आभ्यासु प्राचार्य म्हणुन मत व्यक्त केले. तसेच वरपडे सरांच्या अध्यापनाचा व कार्याचा गौरव करून कौतुक केले.

यावेळी अध्यक्षीय समारोपा वेळी मा.संभाजीराव पा.केंद्रे म्हणालेकी शेकापूर येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी देशात आणि विदेशात मोठमोठ्या पदावर कार्यरत असल्याममुळे शाळेचे नाव गल्ली ते दिल्ली पर्यंत पोहोचले आहे विद्यार्थांना प्रेरीत करण्यासाठी जिल्हाचे लाडके मा. खा.प्रतापराव पाटिल चिखलीकर साहेब व मी स्वताः एकत्र हातात हात घालुन खुप चांगले काम काँग्रेस मध्ये असतांना तत्कालीन मुख्यमंत्री कै.शंकरराव चव्हाण साहेबांच्या प्रेरणेने कार्य केले असेही ते म्हणाले व सत्कारमूर्ती रामराव वरपडे सरांचे कार्य चांगले आहे. म्हणूनच परीसरातील विध्यार्थांच्या व पालकांच्या मनात घरकरून नावलौकिक केले असे म्हणुन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी पर्यवेक्षक वसंतराव केंद्रे, व्यंकटराव पुरमवार सर, प्रा.अरूण केदार, आमित लोंड सर, बोराळे महेंद्र सर, किशन ठोंबरे, श्रीमंगले सुर्यकांत, साहेबराव काळे , चंद्रकांत पडलवार सर, मेंडके शिवाजी, प्रा.सुर्यकांत गुट्टे, पत्रकार सुर्यकांत केंद्रे अदिसह शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले तर सुत्रसंचलन प्रा. अरूण केदार वमाजी पर्यवेक्षक वसंतराव केंद्रे यांनी केले तर आभार व्यंकटराव पुरमवार यांनी मांडले व वंदेमातरम गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# भूखंड रक्षणार्थ ट्रस्टचे पालकमंत्र्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर पहूर - शेंदूर्णी मार्गावर पहूर पासून अवघ्या २ किलोमीटर अंतरावरील निसर्ग सौंदर्याने नटलेल्या श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकास आणि जिर्णोद्धारासाठी शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी केलेल्या आजन्म भिक्षा झोळी संकल्पाद्वारे विविध विकास कामे होत असून मंदिरासमोरील खुला भूखंड रक्षणार्थ पालकमंत्री नामदार गुलाबराव पाटील यांना श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा पुजारी शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी लेखी निवेदन दिले. जळगाव तालुक्यातील तरसोद येथील ब वर्ग दर्जा प्राप्त श्री क्षेत्र गणपती मंदिर ट्रस्टच्या माध्यमातून ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ९५ लक्ष रुपये निधीतून उभारण्यात आलेल्या भव्य भक्त निवासाचे लोकार्पण व राज्य शासनाच्या पर्यटन विकास योजनेअंतर्गत ४ कोटी ८९ लक्ष रुपये निधीतून होणाऱ्या विविध विकास कामांच्या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी गुलाबराव पाटील यांना शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी सदर निवेदन सादर केले. प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत अडीच कोटी रुपयांचा निधी श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर विकास कामांसाठी मिळणार असून जिल्हाधिकारी अमन मित्तल यांच्या माध्यमातून पर्यटन संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.





# सुमार्ग दाखविण्याचे काम संत -महात्मे करतात : महंत उद्धव महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** या ज्ञान, तंत्रज्ञान व विज्ञान युगात ही समाजातील माणसे व्यसन, विकार, वाममार्गने जात आहेत या भरकटत चाललेल्या माणसांना सुमार्ग दाखविण्याचे काम संत -महात्मे करतात असे उदगार श्री संत तुकाराम महाराज आश्रम नेवासा चे महंत उद्धवजी महाराज मंडलिक वैजापूर येथील प,पू,दत्तागिरी महाराज आश्रमात सुरू असलेल्या श्री दत्त जयंती उत्सव व संत जनार्दन स्वामी बाबाजींच्या ३३व्या पुण्य स्मरण निमित्त आयोजित कीर्तनाचे सहावे पुष्प गुंफताना काढले या प्रसंगी प,पू,दत्तगिरी महाराज, माजी खा, चंद्रकांत खैरे, आ. रमेश पा, बोरणारे, उपनगराध्यक्ष साबेरखान,बाबासाहेब जगताप, कल्याण जगताप, संजय निकम, अंकुश हिंगे, धोंडीरामसिंह राजपूत बापू गावडे, डॉ,राजीव डोंगरे, डॉ. बाबासाहेब इंगळे, ज्ञानेश्वर जगताप, प्रकाश चव्हाण यांच्या सह शहरव पंचक्रोशीतील भक्त-भाविक मोठया संख्येने उपस्थित होते या सात दिवशीय कार्यक्रमाचा समारोप बुधवार( ता,०७) रोजी भंगासी माता गडचे महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्या प्रवचन व महाप्रसाद वाटपाणे होणार आहे, सूत्रसंचालन व आभार श्री राजपुत यांनी केले.

# मढ येथे तंट्या भिल यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यातील मढ या गावामधे दिनांक ४ डिसेंबर २०२२ रोजी आदिवासी समाजाचे जन नायक राबीनहुड म्हनुण ओळख असलेले शुर विर तंट्या भिल यांच्या शहीद बलीदान दिनी तंट्या मामा यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र एकलव्य आदिवासी तडवी भिल्ल विकास परिषद या सामाजिक संघटना तर्फे सामाजिक जनजागृति कार्यक्रम घेण्यात आला. या जनजागृति कार्यक्रमादरम्यान संघटनेचे प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी यांनी आदिवासी समाजाला तंट्या भिल यांच्या बद्दल माहिती त्यांचा इतिहास सांगीतला आणि आदिवासी योजनांबद्दल ही मोलाची माहिती दिली या कार्यक्रमादरम्यान सुत्रसंचालन डा. समिर तडवी म. प्रदेश सल्लागार यांनी केले या वेळेस संघटनेचे पदाधीकारी मराठवाडा संघटक इरफान तडवी जळकी कर, जालना जिल्हा अध्यक्ष इसराईल तडवी वाढोणा, बुलढाणा तालुका अध्यक्ष, महम्मद तडवी, सिल्लोड ता. अध्यक्ष सलाउद्दिन तडवी, औरंगाबाद जिल्हा संघटक समिर तडवी जळकीकर, सलिम तडवी, शफीक तडवी, रफीक तडवी, वसीम तडवी, राशदबाई, रुकसना तडवी, इरशादबाई, अलीशानबाई, चांद तडवी, बनेखा बरडे, शामिरखा बरडे,शाहरुख बरडे, मरजीना बागुल, आयुष तडवी, हसन तडवी, सलिम बागुल आणि आदिवासी महिला, पुरुष लहान मुलं, मुली , ग्रामस्थ मोठ्या संख्यने उपस्थित होते.



# नूरानी मस्जिदमध्ये सर्वधर्मसमभाव सद्भावना समारोह संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सामाजिक सलोखा कायम रहावा यासाठी धुळे तालुक्यातील बाळापूर येथील नुरानी मस्जिदमध्ये सर्वधर्मीयांसाठी सद्भावना समारोह कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमातून विशिष्ट धर्माप्रति होत असलेल्या द्वेषाला मुठमाती देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

विशेष म्हणजे या ठिकाणी 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' म्हणून भव्य असं रक्तदान शिबिर राबवून सामाजिक बांधिलकी मुस्लिम बांधवांच्या वतीने जोपासण्यात आली. या कार्यक्रमाला सर्वधर्मातील ज्येष्ठ प्रतिष्ठित नागरिक तसेच पोलीस बांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. आपला भारत देश हा अनेक धर्मांना मानणाऱ्या लोकांचा समावेश असलेला देश आहे. देश ओळखला जातो तिथे



राहणाऱ्या लोकांमुळे. परंतु आपण सर्व जे एकाच माता पित्याची संतान आहोत तेच एक दुसऱ्याला त्यांच्या संस्कृतीला ओळखत नाहीत आणि यामुळे गैरसमज आणि कलह वाढत चालला आहे. हा गैरसमज आणि कलह दूर व्हावा आणि शांतीचे वातावरण आपल्या देशात निर्माण व्हावे, यासाठी एकमेकांची संस्कृती नियम जाणून मस्जिद व मदरसा बाबत गैरसमज दूर करून समाज बांधिलकी जोपासावी. असा संदेश नुरानी मस्जिद याठिकाणी योजकांच्या वतीने देण्यात आला. मस्जिदीच्या सर्व भागांचे दर्शन नमाज़ कशा पद्धतीने होते इस्लाम बाबत माहिती आपल्या शंकाकुशंकेचे निरसन यावेळी करून देण्यात आले. कार्यक्रमाचे अनुषंगाने रक्तदान शिबिर राबवून सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आली. रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदविला. या कार्यक्रमाला मुफ्ती कासीम, मौलाना अब्दुल रहीम, नगरसेवक संजय पाटील, पोलीस तालुका पोलीस दिनेश देवरे, विलास चौधरी सरपंच कैलास पाटील गोकुळ सिंगवी, पत्रकार दिपक वाघ, भाईदास पाटील, सुरेश बडगुजर, एकनाथ पाटील, भुरा सूर्यवंशी, नानाभाऊ पाटील, संदीप पाटील, सूर्यकांत पाटील, समाधान पाटील, रामेश्वर पाटील, विक्रम पाटील, महेश अहिरे, साळुंखे फौजी, डॉ. विजय खैरनार, गोपी सूर्यवंशी, अरुण वाघ, भूषण वाघ, उमेश ब पाटील, बिस्मिल्ला पिंजारी, शफी पिंजारी, भिकन पिंजारी, सुपडू खाटीक, जहांगीर पिंजारी, आरिफ पिंजारी, जब्बार खाटीक, लोकसेवा ग्रुप, धुळे, व फागणे आणि बाळापूर येथील ग्रामस्थ यांनी सहभाग घेतला.

## श्रीमद भगवतगीतेतील प्रत्येक श्लोक मानव जातीला दीपस्तंभाप्रमाणे



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** जगातील सर्व शास्त्रांचे सार म्हणजे गीता ग्रंथ होय, या ग्रंथातील प्रत्येक श्लोक समुद्रातील दीपस्तंभा प्रमाणे या जगतातील मानव जातीला मार्गदर्शक होय असे प्रतिपादन जेष्ठ नागरिक तथा बालसाहित्यक धोंडीराम सिंह राजपूत यांनी शनिवार( ता,०३ )रोजी आधार जेष्ठ नागरिक सेवा संघाने आयोजित केलेल्या गीता जयंती कार्यक्रमात जगतगुरू संत तुकाराम महाराज सभागृहात केले, ते पुढे म्हणाले की,गीता ग्रंथाचे चार स्तंभ ज्ञान,-कर्म-भक्ती-ध्यान हे या भूतलावरील प्रत्येक व्यक्तीने पाळले तर त्यांच्याद्वारे सदैव विधायक कार्य होतील व जीवन आनंद दायी होईल. याप्रसंगी अध्यक्ष स्थानी नारायणी सेनेचे राज्य अध्यक्ष  अशोक पवार आप्पा होते तर व्यासपीठावर सर्वश्री अण्णासाहेब शेळके, ज्येष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, अली अहमद, पोपट भोसले, उत्तमराव साळुंके, वैजीनाथ आप्पा मिटकरी यांची उपस्थिती होती, माजी आ. आर. एम. वाणी यांनी स्थापन केलेल्या या संघातर्फे सर्व प्रथम गीता ग्रंथाचे पूजन करण्यात आले. प्रार्थना आसाराम निकम यांनी सादर केली तर पसायदान उपाध्यक्ष उत्तमराव साळुंके यांनी सादर केले. डिसेंबर महिन्यात ज्या जेष्ठ नागरिकांचे वाढ दिवस होते त्यांचे गुलाब पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी अशोक धसे, मुकुंद दाभाडे, बाबुराव वाणी, निकम, पी.बी. त्रिभुवन, सोपान निकम यांची उपस्थिती होती.

## संतापाची लाट



राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्याकडून वारंवार येत असलेल्या आक्षेपार्ह विधानांवरून महाराष्ट्रभर संतापाची लाट आहे. समाजसुधारक ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्यानंतर विविधस्तरातून राज्यपालांचा निषेध करण्यात आला आहे. महाराष्ट्रात विरोधकांकडून राज्यपाल हटावची मागणीदेखील जोर धरत आहे. बुधवारी मराठा क्रांती मोर्चा, समविचारी पक्ष तसेच विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी जालन्यात बंद पाळला. छायाचित्र : जावेद तांबोळी

## नागपूरात हवेतला गारठा वाढला


आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** किमान तापमानात वाढ, तरीही हवेत गारठा. गार आणि बोचऱ्या वाऱ्यांनी बुधवारी उपराजधानीची पहाट उजाडली. हुडहुडी भरवणाऱ्या थंडीने डिसेंबर महिना नागपूरकरांना चांगलेच गारठावून सोडणार आहे. नोव्हेंबरच्या अखेरीस तापमानात चांगलीच घट झाली होती. शहराचे तापमान ११ अंश सेल्सिअसवर तर विदर्भातील काही शहरांचे तापमान १० अंश सेल्सिअसवर पोहोचले होते. आता किमान तापमानात वाढ झाली तरीही हवेतील गारठा मात्र वाढला आहे. सामान्यतः डिसेंबर महिन्यात रात्रीचा पारा घसरण्याचे सत्र सुरू होते व कडाक्याची थंडी वाढते. सध्या पारा घसरला नाही, पण गारठा मात्र आहे. यावेळी थंडीला अधिक जोर राहण्याची स्थिती असून दोनदा थंडीची लाट सहन करावी लागण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.याच उपराजधानीने अलीकडेच काही वर्षांपूर्वी ३.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद घेतली आहे. या काळात उत्तरेचा भाग हिवाळी पावसाने प्रभावित राहत असल्याने थंडे वारे मध्य भारताकडे प्रवाहित होत असल्याने थंडीत वाढ होते. सध्या ढगाळ वातावरणामुळे दोन्ही तापमानात अंशतः वाढ झाली आहे. २४ तासात पारा वाढला असला तरी सरासरीपेक्षा तो कमीच आहे. त्यामुळे दिवसा हलकी व रात्री कडाक्याच्या थंडीची जाणीव होत आहे. मात्र, डिसेंबर महिन्यात थंडीत वाढ होण्याची शक्यता देखील हवामान अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.

## राजमाता जिजाऊ राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** अंधश्रद्धा निर्मूलन वैज्ञानिक दृष्टिकोन समिती



यांचेकडून दरवर्षी दिला जानारा मानाचा राजमाता जिजाऊ राज्यस्तरीय पुरस्कार हा संपुर्ण महाराष्ट्रातील समाजा प्रती संवेदनाची जाणिव व समाजाप्रती बांधिलकी असणाऱ्या व्यक्ती व संस्थांसामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक,शिक्षण, साहित्यिक, कला. क्रीडा, कोरोना, मार्केटिंग, आरोग्य,पत्रकारीता, शेती मीडीया, प्रशासन,इत्यादीं श्रेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील २१ व्यक्तींना किंवा संस्थेस राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कारदेवुन प्रोत्साहन मिळावे म्हणून देण्यात येतो (कोरोना प्रोटोकॉल पाळून) सदरील पुरस्कार मालेगाव, धुळे, नाशिक पैकी एका ठिकाणी होईल पुरस्कारार्थीना मान्यवरांचे हस्ते 3 फुटाचे आकर्षक स्मृतिचिन्ह, 3 फुटाचे आकर्षक सन्मानपत्र, 2023च्या दिनदर्शिकेत प्रत्येक पानावर स्थान, 5 पुस्तके, पुरस्कार्थींच्या कार्याची स्पेशल पुरवणी, कार्याची मोठ्या पडद्यावर 3मिनिटाचा व्हिडीयो, कार्यक्रमाचे थेट टि व्ही वर प्रेक्षपण, शाल श्रीफळ ईत्यादीने गौरविण्यात येणार आहे. तरी आपले प्रस्ताव ANDHASHARDHAVAIDYANIKSAMITI@GMAIL.COM ह्या ईमेलवर किंवा TANAJISHINDE787@GMAIL.COM किंवा खालील पत्यावर किंवा 7887331861 ह्या व्हॉट्सअप वर  १५\१२\२०२२ प्रयन्त पाठवावीत असे आवाहन अंधश्रध्दा निर्मुलन वैज्ञानिक दृष्टिकोन प्रबोधन समितीचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष शांताराम मगर यांनी केले आहे.

## प्रमोद महाजन प्रशिक्षक तर करण खोमणे संघ व्यवस्थापकपदी

### उडीसा येथे होणार राष्ट्रीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** भारतीय टेनिस व्हॉलीबॉल महासंघाच्या वतीने पॅरादीप उडीसा येथे 23 ते 25 डिसेंबर दरम्यान होणाऱ्या 24 व्या युथ व मिनी गटाच्या राष्ट्रीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी सिद्धनाथ वाडगाव येथील श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुलचे सचिव तथा  औरंगाबाद टेनिस व्हॉलिबॉलचे सचिव प्रमोद राजुसिंग महाजन यांची महाराष्ट्र संघांचे प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे तसेच जिल्हा टेनिस व्हॉलीबॉलचे कोषध्यक्ष करण रावसाहेब खोमणे यांची महाराष्ट्र संघांचे संघ व्यवस्थापक म्हणून निवड झाली आहे जालना येथे झालेल्या राज्य स्पर्धेत गंगापूर येथील





वंडर किड्स इंग्लिश स्कुल चा तसेच इन ग्राउंड स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये सराव करणारा खेळाडू पवन संतोष खाडे व भारत रत्न मदर टेरेसा शाळेचा खेळाडू कार्तिक प्रवीण भुसारे यांनी चमकदार कामगिरी करत महाराष्ट्र मुलांच्या संघात स्थान मिळवले आहे महाराष्ट्र संघांचे प्रशिक्षण शिबीर हे गंगापूर येथे 19 ते 21 डिसेंबर दरम्यान गंगापूर येथे होणार असून त्यानंतर हा संघ राष्ट्रीय स्पर्धेसाठी पुणे येथून रवाना होणार आहे. या निवडीसाठी टेनिस व्हॉलीबॉल खेळाचे जनक डॉ. व्यंकटेश वांगवाड, महाराष्ट्र टेनिस व्हॉलीबॉलचे उपाध्यक्ष डॉ. आबासाहेब सिरसाठ,महाराष्ट्र चे सचिव गणेश माळवे, फादर विल्फ्रेड सलढाणा,वाल्मिक सिरसाठ,इनग्राउंड स्पोर्ट्स चे विश्वजीत चव्हाण, प्रा.उदय तगरे,नवनाथ कानडे,संतोष खाडे,जिवन बैनाडे, रामेश्वर म्हस्के, योगेश बिलवाल, संदीप मुराडे,मेहमूद पठाण, अली बाकोदा, अब्दुल बागेस आदींनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## माहेरचा उंबरठामध्ये गृहिणींनी अनुभवला मायेचा ओलावा

### सालईबनातील निवासी महिला शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** प्रत्येकीच्या डोळ्यात आनंदाश्रू, चेहऱ्यावर समाधानाचा भाव, विविध भावनांनी उचंबळून आलेले हृदय, माहेरवाशिणीला मिळणारे प्रेम असा मायेचा ओलावा अनेक गृहिणींनी अनुभवला. निमित्त होते सातपुड्यात वसलेल्या सालईबनातील "माहेरचा उंबरठा' या निवासी महिला शिबिराचे.  तरुणाई फाउंडेशन खामगावच्या महिला कार्यकर्त्यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. सातपुड्याच्या पायथ्याशी निसर्गरम्य वातावरणात २५ ते २७ नोव्हेंबर दरम्यान हे ३ दिवसीय शिबीर तरुणाईचे मंजितभाई शीख यांच्या मार्गदर्शनात पार पडले. ३० ते ५० या वयोगटातील गृहिणींच्या गरजा लक्षात घेऊन शिबिराची रूपरेषा ठरवण्यात आली होती. आरोग्य तपासणी, मार्गदर्शन, परसबाग लागवड प्रात्यक्षिक व मार्गदर्शन, ताणतणाव व्यवस्थापन, महिला कायदेविषयक माहिती, घरगुती सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन, योग व ध्यान, वैज्ञानिक दृष्टिकोन, आकाश निरीक्षण, जंगलभ्रमण, आदिवासी महिलांच्या जीवनशैलीची पाहणी, आरोग्यदायी आहार, अभ्यंगस्नान, विविध खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य संगीत अश्या उपक्रमातुन महिलांना हसते खेळते करण्यात आले. शिबिराचे उदघाटन श्री कोटेक्स जिनींगच्या संचालिका डॉ. अपर्णाताई कुटे यांच्या हस्ते व तरुणाई फाउंडेशनचे चे अध्यक्ष नारायण पिठोरे, सचिव राजेंद्र कोल्हे, यांच्या उपस्थितीत झाले. पहिल्या सत्रात प्रसिद्ध सूत्रसंचालक, साहित्यिक, समुपदेशक अरविंद शिंगाडे यांनी ताणतणाव व्यवस्थापन यावर महिलांना मागर्दर्शन केले. रात्री नाईट वॉक मध्ये प्रवीण भोपळे यांनी आकाश दर्शन घडविले.

दुसऱ्या दिवशी पहाटे सौ. सुनिता पवार व सौ. प्रगती सोनटक्के यांनी योग प्रशिक्षण दिले. सकाळी जीएसटी अधिकारी सौ. शितल पडोळ यांनी रोजच्या वापरासाठी घरातल्या घरात विषमुक्त भाजीपाला कसा पिकवावा यांची माहिती देऊन परसबाग बनविण्याचे प्रात्यक्षिक दिले. गजानन व्यवहारे यांनी परसबाग तयार करण्यात मदत केली. दुपारी पोलीस



विभागाच्या ज्योती धंदर यांनी महिला विषयक कायदे व कौटुंबिक समस्या निवारण याबाबत मार्गदर्शन केले. नंतर विविध विषयांवर महिलांची गटचर्चा घेण्यात आली.

तरुणाई परिवाराने महिलांच्या आरोग्याची पण दक्षता घेतली.सायंकाळच्या सत्रात  सर्व महिलांची आरोग्य तपासणी डॉ.देवयानी शाम उमाळे यांनी करून आवश्यक त्यांना औषधोपचार पण केला. उप जिल्हा सामान्य रुग्णालयाचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ विठ्ठल पवार यांनी सुद्धा रक्त तपासनी केली. तिसऱ्या दिवशी पहाटे महिलांना जंगल भ्रमण घडविण्यात आले. विविध वृक्ष, वन्यजीव व जंगलाचे आपल्या जीवनातील महत्व याबाबत वन परिक्षेत्र अधिकारी किशोर पडोळ  यांनी महिलांना मोलाची माहिती दिली. यानंतर परिसरातील वडपाणी या आदिवासी वस्तीला भेट देऊन आदिवासी महिलांसोबत संवाद, जीवन शैलीची माहिती शिबीरार्थींनी घेतली.  दुपारी घरगुती आपत्ती व्यवस्थापन यावर हिंदुस्थान युनिलिव्हरचे सुरक्षा व्यवस्थापक जिगरगिरी गोस्वामी यांनी तर शारीरिक व मानसिक आरोग्यविषयक माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.उज्ज्वला पाटील यांनी दिली.

शिबिराचे नियोजन तरुणाई फाउंडेशनच्या सौ. साधना पाचरणे, सौ.सुचितातार्ई उमाळे यांनी केले तर सौ. ज्योती कोल्हे, सौ.जयश्री पिठोरे, सौ.प्रगती सोनटक्के, सौ.अनिताकौर,  सौ.दिपा भोपळे,  सौ.श्रद्धा कळसकर,  सौ. सुनंदा व्यवहारे, सौ.सुयशा कांडेकर, सौ. सुनंदा बाळापुरे ,  सौ.सीमा जाखोटिया, यांचे आयोजनासाठी सहकार्य लाभले. माहेरचा उंबरठा या शिबिरात महिला भगिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याबद्दल ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सौ सुचितातार्ई उमाळे यांनी सर्वांचे आभार मानले आणि ह्या उपक्रमाला सहकार्य केल्याबद्दल सलाईवन परिवार आणि तरुणाईच्या सदस्यांप्रति सुद्धा कृतज्ञता व्यक्त केली.

# रानमेवा होतोय दुर्मिळ, नवी पिढी राहणार चवीपासून वंचित



आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणी खुर्द :** गावरान बोरं अलीकडे दिसेनाशी झाली आहेत. गावरान बोरांचे नाव जरी काढले तरी तोंडाला पाणी सुटते, अशी या गावरान बोरांची ख्याती प्राप्त आहे; पण काळाच्या ओघात ही बोरं लुप्त पावत चालली आहेत. पूर्वीच्या काळी ग्रामीण भागासह शहरी भागातही फक्त गावरान बारीक बोरच मिळत होते पण आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वेगवेगळ्या प्रकारच्या बोरांच्या जाती निर्माण करण्यात आल्या खऱ्या पण यात गावरान बोरांची मजा बिल्कुलच नाही हे मात्र खरं याच कालावधीत जंगलात , टेंभर, कवठ, बोर करवंद बिबा. मध.डिंक.आदी निसर्गाचा गोडवा असलेली फळे पूर्वी बाजारात विक्रीला यायची. परंतु, बदलत्या जीवनमानामुळे या जंगली फळांची जागा आता इतर देखण्या फळांनी घेतली आहे. त्यामुळे हा रानमेवा लुप्त होऊन भावी पिढीला त्याचा गोडवा चाखता येणे शक्य होणार नसल्याचे दिसून येत आहे.

ग्रामीण भाग हा निसर्ग संपन्नतेने नटलेला आहे. येथील रानावनात बहुपयोगी विविध प्रकारच्या आयुर्वेदिक वनस्पतीसह रानातील मेवा असलेली विविध फळे आहेत. त्यात चारोळी, बोर, टेंबर, कवळ, आवळा, चिंचा इत्यादी जंगली फळे आहेत. ही फळे काही वर्षांपूर्वी बाजारात शाळेच्या आवारात विक्रीला येत होती. ग्रामीण भागातील महिलांचा तो व्यवसाय असायचा. त्यातून मोठी मिळकतही होत होती. परंतु, आज होणारी जंगलतोड, जंगली जनावरांचा वावर, सोबतच सुधारित जातीचे विदेशी आकर्षक फळे बाजारात उपलब्ध असल्याने या गवराण रानमेव्याकडे दुर्लक्ष होत आहे. मोठ्या मेहनतीने ही फळे आणली तरी, आज बाजारात विविध देखणी फळे विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने या फळाकडे कुणी लक्ष देण्यास तयार नाही. आंबट, गोड असा स्वाद असलेला रानमेवा म्हणून सर्वपरिचित गावरान बोरांना एवढा भाव चढला आहे की, सध्या सफरचंदापेक्षाही ती महाग आहेत. बाजारात सफरचंद 100 रुपये किलो, तर गावरान बोरं 120 रुपये किलोपर्यंत विकली जात आहेत. मन्याड खोऱ्यात सह डोंगर रांगात, नाला काठेला, शेतात बोरांची असंख्य झाडे आहेत. ग्रामीण भागातील महिला, पुरुष डोंगररांगात, वनराईत फिरून बोरं वेचून आणतात व विकतात. अनेकांनी शेतातही बोराची झाडे लावली आहेत. बोरांचे आयुर्वेदात मोठे महत्त्व आहे. यामुळे आता बोर खाण्याकडे अनेकांचा कल वाढत आहे. बोर वाळवून त्याचे खारका तयार केले जातात. सध्या सुरुवातीला बोरांची आवक कमी असल्याने भावाने शंभरी पार केली आहे. सध्या तरी सफरचंदापेक्षा जास्त भाव बोराला मिळत आहे.

### शहरात सोन्याचा भाव, कष्टकरी अनभिज्ञ .....!

चारोळी, बिब्बा या रानमेव्याला शहरातील मॉलमध्ये सोन्यासारखा भाव आहे . मात्र, जो आदिवासी बांधव हा रानमेवा गोळा करतो, त्याचा कच्चा माल मातीमोल भावात घेतला जातो . बाजारपेठेची अनुपलब्धता, व्यवहाराची अनभिज्ञता यामुळेच हे शोषण होत आहे . हायटेक जीवनमानाच्या ओघात निसर्गाचे देणे असलेला रानमेवा दूर सारला जात आहे . हा लज्जतदार रानमेवा आता मिळणे कठीण झाले आहे . तर, भावी पिढीला त्याची चवच महिती नसणार आहे . या रानमेव्यास पूर्वीचे भरभराटीचे दिवस येणे गरजेचे आहे .

**ॲपल बोरांची आवक कमी**

गावरान बोरांआधी मोठ्या आकारातील चमेली बोरं बाजारात येत असतात . मात्र यंदा अपेक्षेनुसार या बोरांची आवक वाढली नाही . जळगाव, सोलापूर या भागांतूनही बोरं येतात . सध्या 40ते 50 रुपये किलोने ही बोरं मिळत आहेत .

**शेतात बोरांच्या झाडांचे प्रमाण वाढले ....**

मध्यंतरी चमेली बोरांना मोठी मागणी असे . पण हे बोर चवीला पांचट लागत असल्याने आता पुन्हा गावरान बोरांकडे वळले आहेत . यामुळे अनेकांनी शेतात गावरान बोरांची झाडे आहेत . बोरकूटसाठीही बोरांना मागणी असते . यंदा पोषक वातावरणामुळे बोर भरपूर आहे . – अर्जुन जाधव शेतकरी

# श्री दत्त जयंतीनिमित्त स्वामी समर्थ केंद्रात विविध धार्मिक कार्यक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात येणाऱ्या श्री दत्त जयती निमित्त श्री गुरुचरित्र पारायण, नवनाथ ग्रंथ,भागवत, श्रीपाद, श्री वल्लभ, दुर्गा सप्तमी, मल्हारी शतसती इत्यादी ग्रंथाचे दि,१डिसेंबर,पासून व वाचन होत आहेत. सोनाली त्रिभुवन व कविता पुरी वाचक आहेत, ८डिसेंम्बर रोजी या कार्यक्रमाची सांगता स्थापित देवता विसर्जन, अखंडनाम जय यज्ञ, सप्ताह सांगता आरती व महाप्रसाद वाटपाने होणार आहे,सदरील कार्यक्रमात विविध ग्रंथ वाचनात ११०महिला व ७०पुरुषांनी सहभाग घेतलेला आहे, माजी नगरसेवक लिमेश वाणी, सुरेश आलुले, ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत, गणेश संतपाल, तुषार अनर्थे, विक्रम देवकर, श्रेयस चौहान, संदीप मोटे, सुमनबाई आलूले, आकाश मापारी, अरविंद तुपे, शिल्पा तुपे, सी.के.पवार, दत्ता रोजेकर,साळवे आप्पा, घनश्याम वाणी, मीना वाणी, इत्याडी भक्त उपस्थित होते

# भाजपा अनुसूचित जाती पदाधिकारी यांच्याकडून महामानवास अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त कन्नड शहरातील मध्यवर्ती उद्यानातील संविधान नायक घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालुन भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे ग्रामीण जिल्हा अध्यक्ष राजेद्र गव्हाणे यांच्या प्रमुख उपस्थीत अभिवादन करण्यात आले. यावेळी गव्हाणे बोलताना म्हणाले बाबासाहेबांच्या विचाराची मशाल नेहमी तेवत ठेवूया त्यांनी दिलेल्या संविधानानुसार पुढे चालण्याच्या संकल्प करूया डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या ज्ञानाच्या अथांग महासागरास विनम्र अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा संभाजीनगर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र गव्हाणे जिल्हा उपाध्यक्ष कैलास जाधव, पोलीस उपनिरीक्षक भूषण सोनार, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा कन्नड शहराध्यक्ष संतोष पुसे जिल्हा पदाधिकारी व कन्नड तालुका शहर व ग्रामीण पदाधिकारी उपस्थित होते.

# मनोज जोशी यांच्या ‘चाणक्य’ने रसिक भारावले; ट्रान्सजेंडर कलाकारांची अप्रतिम प्रस्तुती

आधुनिक केसरी न्यूज

**माधुरी पांडे**

**नागपूर :** राजनीती, अर्थनीती व ज्योतिषाचार्यात पारंगत असलेल्या विष्णुगुप्त आर्य चाणक्यच्या राष्ट्रधर्माची शिकवण देणा-या ‘चाणक्य’ या महानाट्याचे प्रस्तुतीने नागपूरकर रसिक भारावले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या मध्य भारतातील सर्वात मोठ्या खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या चौथ्या दिवसाची सुरुवात सायंकाळी 6 वाजता ‘जागर राष्ट्रभक्तीचा’ या देशभक्तीपर गीताच्या कार्यक्रमाने झाली. श्याम देशपांडे यांच्या नेतृत्वातील गायकांनी विविध गीते सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोल गलांडे यांनी केले. त्यानंतर ट्रान्सजेंडर कलाकारांचे कार्यक्रम व नंतर ‘चाणक्यनीती’साठी प्रसिद्ध असलेल्या आर्य चाणक्य यांच्यावर आधारित प्रसिद्ध अभिनेते मनोज जोशी दिग्दर्शित व अभिनीत ‘चाणक्य’ हे महानाट्य सादर करण्यात आले. सोमवारी झालेला हा या नाटकाचा 1780 वा प्रयोग होता.




राष्ट्रधर्माशिवाय कुठलाच धर्म, कुठलीच नीती श्रेष्ठ न मानणारे एक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व म्हणजे विष्णुगुप्त आर्य चाणक्य. भारतात २३०० वर्षांपूर्वी एक मुरब्बी, मुत्सद्दी राजकीय मार्गदर्शक, आक्रमक विधानातून नेमकेपणाने राष्ट्रीयतेची नीती शिकविणारे गुरू, विद्वेषी आणि लोभी राज्यांच्या खंडाखंडात विभागलेल्या भारतास एकसंध, एकछत्र राष्ट्रनिर्मितीसाठी ‘शेंडीला गाठ बांधणार नाही’ अशी प्रतिज्ञा करीत दासीपुत्र व शूद्र म्हणून हिणवलेल्या पराक्रमी चंद्रगुप्ताच्या नेतृत्वात आपली शपथ पूर्ण करणारे आर्यपुत्र कुलगुरू अशी ओळख असलेले चाणक्य या राष्ट्रधर्माची प्रेरणा जागविणाऱ्या या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाचे जाज्वल्य दर्शन सोमवारी नागपूरकरांना झाले. कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रसिद्ध उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते सत्यनारायण नुवाल, माजी खासदार अजय संचेती, हितवादचे मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र पुरोहित, नागपूर सुधार प्रन्यासचे मनोज सुर्यवंशी, प्रसिद्ध व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते विलास काळे, किन्नर महामंडळाच्या महाराष्ट्र प्रदेश सदस्य राणी ढवळे यांची उपस्थर्ति होती.

नितीन गडकरी म्हणाले, आज आनंदाचा क्षण की आपल्या व्यासपीठावर समाजातील अन्यायग्रस्त घटकांना मानाने व सन्मानाने आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. समाजातील शोषति, वंचित, पिडीतांना समान संधी मिळाली पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते. तोच धागा पकडून खासदार सांस्कृतिक महोत्सवात समाजातील सर्व स्तरातील लोकांना संधी देण्याचा आयोजन समितीचा उद्देश आहे, ऐ नितीन गडकरी म्हणाले.

खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, सर्व उपाध्यक्ष प्रा. मधुप पांडे, डॉ. गौरीशंकर पाराशर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सर्व सदस्य बाळ कुळकर्णी, सारंग गडकरी, अविनाश घुशे, हाजी अब्दुल कादीर, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर, ॲड. नितीन तेलगोटे, विलास त्रिवेदी, आशिष वांदिले, चेतन कायरकर, भोलानाथ सहारे, किशोर पाटील, मनीषा काशिकर यांचे सहकार्य लाभत आहे.

**ट्रान्सजेंडर कलाकारांची शानदार प्रस्तुती**

बालकलाकारांपासून ते राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय स्तरावर कलाकारांपर्यंत, दिव्यांग, सेवावस्तील मुलांपासून ते ट्रान्सजेंडर अशा सर्वांना मंच मिळावा या उद्देशाने प्रेरित खासदार सांस्कृतिक महोत्सवात चौथ्या दिवशी मिशन विश्व ममत्व फाउंडेशरच्या ट्रान्सजेंडर कलाकारांना अप्रतिम नृत्य सादर करून रसिकांना अचंबित केले. मुद्रा डान्स अकादमीमध्ये तयार झालेल्या 15 ट्रान्सजेंडर कलाकार सहभागी झाले होते. राजस्थानातील घुमर नृत्याने कार्यक्रमाने सुरुवात केली. उत्तरप्रदेशातील मोहे रंग दो लाल, पंजाबचे भांगडा, गुजरातचे पिया रे पिया रे, महाराष्ट्राची लावणी अशा विविध गाण्यांवर या कलाकारांनी नृत्य सादर केले. कार्यक्रमाचा शेवट विविधतेने नटलेल्या भारतमातेला वंदन करण्याकरिता ‘वंदेमातरम’ या गीताने केला. श्रद्धा जोशी व जयश्री बारई यांच्या नेतृत्वातील या कलाकारांनी खासदार सांस्कृतिक महोत्सवात संधी दिल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्र्हसंचाल स्वरा वशि्वास यांनी सूत्रसंचालन केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मंदिरावर कळस अंगणात तुळस छत्रपती शिवरायांमुळे : ह.भ.प.संदीप महाराज पवार



आधुनिक केसरी न्यूज

**बनशेंद्रा :** भारतामध्ये मंदिरावर कळस अंगणात तुळस छत्रपती शिवरायांमुळे असल्यामूळे हिंदू धर्म अबाधित आहे असे ह.भ.प.संदीप महाराज पवार यांनी बनशेंद्रा येहे कै. पै.लक्ष्मण (बाबा) चोपडे यांच्या दशक्रिया निम्मिताने आयोजित कीर्तनमालेत पुष्प गुंफताना सांगितले.

यावेळी बोलताना महाराजांनी आजच्या परिस्थितीवरही टीका करत परमार्थ व ईश्वर नाम चिंतन हाच संसाररूपी समुद्र पार करण्याचा एकमेव मार्ग असल्याचे सांगून आई वडीलांची सेवा करा जीवन खूप सुंदर आहे एकमेकांचा आदर करा असेही सांगितले यावेळी महाराजांनी छत्रपती शिवरायांचे थोडक्यात जीवनचारित्र्य सांगितले व हिवन जगावे तर छत्रपती शिवराय यांच्यासारखे कारण छत्रपतींनी अठरा पगड जातीला सोबत घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापन केले.

## पहूरला सावित्रीबाई फुले विद्यालयात महापरिनिर्वाण दिन

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** पहूर येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्तअभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी पहुर पेठचे माजी उपसरपंच रवींद्र मोरे हे होते. प्रारंभी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. गौरव शेलवडकर, रूपाली माळी, मोनाली बनकर, रुचिता पाटील, प्राजक्ता तायडे, अक्षय जाधव यांच्यासह विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष रवींद्र मोरे आणि शंकर भामेरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापिका व्ही.व्ही. घोंगडे, उपमुख्याध्यापिका के.ए. बनकर यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

## रयत शेतकरी संघटनेच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालय येथे निवेदन सादर



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** मा. उच्च न्यायालयाने व हाय कोर्टाने शासकीय गायरान जमिनीवर बेघर व भूमिहीन यांनी केलेले अतिक्रमण काढून घ्यायचे आदेश दिले आहे अतिक्रमण केलेल्या धारकांच्या जागा नावे होण्यासाठी शासनाने अतिक्रमण धारकांच्या समर्थनात पुनर्विचार याचिका याचिका दाखल करणे व राज्यातील अतिक्रमण धारकास न्याय कसा मिळेल महाराष्ट्र राज्य रयत शेतकरी संघटनेच्या वतीने राज्यातील शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमण धारकास निवेदन सादर करण्यात येते की नमूद गायरान जमिनीवरील वस्ती करून राहतो आमची व आमच्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहोत आम्ही सर्व लोक अनुसूचित जाती जमाती व इतर मागास प्रवर्गातील व इतर अतिक्रमण धारक नागरिक यांनी अतिक्रमण करून पक्के घरे बांधलेली आहेत उच्च न्यायालयाने आदेश दिल्यामुळे अतिक्रमण धारकाचे घरी पाळण्यात येऊ नये अतिक्रमण धारकाचे घरे पाडल्यास त्यांचे कुटुंब रस्त्यावर येईल व त्यांच्या कुटुंबाच्या राहण्याची गैरसोय होईल तसेच शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे ती जागा त्यांच्या नावे करण्यात यावी सदरील अतिक्रमण धारक अन्नधान्य पीकून त्यांची उपजीविका चालवतात अतिक्रमण केलेल्या धारकांच्या जागा नावे होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अतिक्रमण धारकाच्या समर्थनात शासनाने सर्वोच्च न्यायालय मध्ये पुनर्विचार याची का दाखल करून अतिक्रमणधारकास न्याय कसा मिळेल याचा विचार करून त्यांच्या बदल्यात असलेली शासकीय जमीन त्यांची नावे कसे होईल याबाबत विचार करण्यात यावा असे रयत शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ऍड रवी प्रकाश उर्फ बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय कार्यालय येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी रयत शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष तय्यब पटेल सरचिटणीस सुनील ठोसर मराठवाडा सरचिटणीस त्रिंबक नागरे महिला प्रदेशाध्यक्ष नयनाताई गवळी जिल्हा उपाध्यक्ष गजानन पाटील जिल्हा उपाध्यक्ष पुंडलिक कदम तालुका अध्यक्ष खुलताबाद हरिदास सराटे तालुका अध्यक्ष कन्नड ज्ञानेश्वर जेठे तालुका उपाध्यक्ष रघुनाथ चव्हाण ज्ञानेश्वर नलावडे मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



## राजीव गांधी महाविद्यालयात एक वही, एक पेन देऊन महामानवास अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राजीव गांधी महाविद्यालयात एक वही, एक पेन देऊन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिना निमित्त अनोखी आदरांजली वाहण्यात आली आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून धुळे तालुका तालीम संघाचे अध्यक्ष पै कल्याण गरुड यांच्या हस्ते मुलांना एक वही व एक पेन देण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले आहे. यांप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष राजीव गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पवार, होते. तसेच सेवा फाऊंडेशन धुळ्याच्या अध्यक्षा डॉ.चंद्रकला मोरे, सपना शिरसाठ, पूनम शिरसाठ यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमला जे. बी. सोनवणे, के. पी.पाटील, सुनील ठाकरे, एम एस सूळ, श्रीमती मोरे, किरण बोरसे, एच आर देवरे यांनी परिश्रम घेतले.



## महापरिनिर्वाणदिनी भव्य रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**वाटूर फाटा :** येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनी सम्यक संकल्प बहुउद्धेशिय सेवाभावी संस्था आकणीच्या वतीने सलग तिसऱ्या वर्षीही वाटूर फाटा येथे संस्थाध्यक्ष अनिल मोरे यांच्या नेतृत्वात अभिवादन सभा व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमारंभी सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अभिवादन सभेस वाटूर येथील जेष्ठ नागरिक विक्रम नाना माने , गणपत वारे, वाटूर ते उपसरपंच बद्रीभाऊ खवणे, युवा नेते नितीन जेथलिया, परतूरचे पोलीस उपनिरीक्षक पुंडगे साहेब. बाळासाहेब अंभिरे (प्रदेश सरचिटणीस अनुसुचती जाती विभाग) डॉ. गजानन केशरखाने सरपंच वाटुर, सामाजिक कार्यकर्ते रंगनाथ वटाणे, डॉ.धोंडोपंत मानवतकर, माजी सभापती सुशीला अंभिरे, लक्ष्मण शिंदे तालुकाध्यक्ष युवक काँग्रेस, नजीरभाई पटेल, मदन हजारे, डॉ.नरेंद्र केशरखाने, महादेव जनकवार, जगदीश पडुळकर ग्रा.प. सदस्य, गौतम डावरे, बाळासाहेब सातपुते, संदेश मोरे, तात्याराव ढगे, अनिल वटाणे, शाहुराव शेंडगे, श्याम खोंड तालुका व्यवस्थापक पंचायत समिती मंठा, गणेश खरात, रतन सिरसाट संजय सिरसाट, अनिल मोरे, गणेश सोनवणे, प्रकाश साळवे, कारभारी सातपुते, अतुल खरात, महेंद्र टेकुळे राजेश सय्यद, तय्यब पठाण, दत्ता भद्रगे, एकनाथ राऊत अध्यक्ष आधार संस्था, राजू आवारे, संदीप दाभाडे तालुका व्यवस्थापक परतूर , लक्ष्मण शिंदे एम.आय.एस परतूर, आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात ६३ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.



**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन फुलंब्री नगरपंचायत येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करताना नगराध्यक्ष सुहास भाऊ शिरसाट व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# 'चला हवा येऊ द्या' च्या स्टेजवरून रवींद्र पाटील चव्हाणांची राजकीय लॉँचिंग

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** नायगाव विधानसभा मतदारा संघाचे



माजी आमदार वसंतराव चव्हाण यांचे सुपुत्र प्रा. रवींद्र पाटील चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधतं धर्माबादमध्ये शुक्रवारी (ता.९) 'चला हवा येऊ द्या' फेम विनोदवीर भाऊ कदम, भरत गणेशपूरे यांच्या विनोदी कार्यक्रमासह महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रमाच्या मेजवाणीचे आयोजन पानसरे शाळेच्या मागील मैदानात करण्यात आले आहे.या निमित्ताने रवींद्र पाटील चव्हाण यांची नायगाव विधानसभेची लॉँचिंग मानली जात आहे. नायगाव विधानसभा मतदार संघामध्ये नायगाव, धर्माबाद व उमरी मतदार संघाचा समावेश होतो.या विधानसभा मतदार संघाचे वसंतराव चव्हाण यांनी २००९, २०१४ प्रतिनधित्व केले.मात्र २०१९ ला राजेश पवार यांनी बाजी मारत या मतदार संघात प्रथमच कमळ फुलविले.या मध्ये सर्वाधिक वाटा धर्माबाद तालुक्याचा होता. ही रणनीती लक्षात घेत प्रा.रवींद्र चव्हाण यांनी मागील काही काळापासून जाणीवपूर्वक धर्माबाद व उमरी तालुक्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. नुकतीच राहुल गांधी यांची 'भारत जोडो यात्रा ' नांदेड जिल्ह्यातून गेली आहे. या यात्रेचे नायगाव विधानसभेच्या नियोजनाची जबाबदारी रवींद्र पा.चव्हाण यांच्यावर सोपविण्यात आली होती.या निमित्ताने जणू अशोकाराव चव्हाणांनी रवींद्र चव्हाणांच्या नेतृत्वाची लिटम्स टेस्ट घेतली होती.यामध्ये रवींद्र चव्हाणांनी सर्व ताकद पणाला





लावून धर्माबाद, उमरी व नायगाव तालुक्यात पूर्व नियोजन बैठका घेऊन आपली जबाबदारी यशस्वी पणे पार पाडली. या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमासाठी धर्माबाद निवडण्या पाठीमागे सूक्ष्म रणनीतीचा भाग म्हणून बघितल जात आहे.यास दोन कारण आहेत.एक नायगाव तालूका चव्हाण कुटुंबावर प्रेम करणारा व त्यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. मात्र २०१९ च्या निवडणुकीत धर्माबाद व उमरीतून राजेश पवारांनी सर्वाधिक मते मिळविली होती.परिणामी राजेश पवारांनी वसंतराव चव्हाणांचा ५४३८४ मतांनी दणदणीत पराभव केला होता.या मध्ये बापूसाहेब गोरठेकर व त्यांच्या समर्थकांनी महत्वाची भूमिका बजावली होती. दोन,२०१४ च्या निवडणुकीत वसंतराव चव्हाण, राजेश पवार व बापूसाहेब गोरठेकर अशी तिरंगी लढत झाली होती. यामध्ये वसंतराव चव्हाणांना ७१०२० राजेश पवार यांना ६०५९५ व बापूसाहेब गोरठेकर यांना ५७२४७ मते मिळाली.वसंतराव चव्हाणांनी राजेश पवार यांचा जवळपास दहा हजार मतांनी पराभव केला होता. अर्थात या दोन्ही निवडणुकीत धर्माबाद व उमरी तालुक्यातील मतांची बेरीज व वजाबाकी हे यशाचे गुपित ठरवीत होते.नुकतेच बापूसाहेब गोरठेकर यांचे निधन झाल्यामुळे चव्हाण कटुंब धर्माबाद व उमरीवर आपले लक्ष केंद्रित करत आहे.त्याचाच एक भाग म्हणून रवींद्र पा.चव्हाण यांच्या वाढदिवसा निमित्त

> चला हवा येऊ द्या व महाराष्ट्राची लोकाधारा ह्या सांस्कृतिक कार्यक्रमाला तालुक्यातील जनतेनी मोठ्या संख्येने उपास्थित रहावे . **– बंडू पाटील बाभळीकर**

धर्माबाद मध्ये चला येऊ येऊ द्या फेम भाऊ कदम, भारत गणेशपूरे यांच्या विनोदचा तर महाराष्ट्राची लोकधारा या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून धर्माबाद मधून लॉँचिंग केली जात आहे. धर्माबाद तालुक्यातील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनीही कंबर कसली असून कोणतीही कसर न ठेवता कामाला सुरवात केली आहे.ग्राउंड तयार करणे असो किंवा प्रचार यंत्रणा राबविणे, नेत्यांना आमंत्रण देणे सर्व चोखपणे पार पाढले जात आहे.भाजपमधील दुफळी व उमरीतून कवळे गुरुजीची साथ यांचा फायदा काँग्रेसला झाल्यास नवलं वाटायला नको असे मत नरेंद्र रेड्डी यांनी व्यक्त केले आहे.